cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१२१ | मंगळवार दि.२१ जुलै २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### शास्त्रज्ञांचे राजीनामे : विज्ञानासाठी इशारा की..?

भारताने गेल्या काही वर्षांत अंतराळ संशोधनात अभूतपूर्व यश मिळवले आहे. चांद्रयान–३, आदित्य–एल१, गगनयानची तयारी आणि आगामी महत्त्वाकांक्षी मोहिमांमुळे भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (इस्रो) जगभरात वेगळी ओळख निर्माण केली आहे. या यशामुळे प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटतो. मात्र, याच काळात इस्रोतील अनेक शास्त्रज्ञांनी राजीनामे दिल्याच्या वृत्तांमुळे एक गंभीर प्रश्न समोर आला आहेभारतातील सर्वोच्च वैज्ञानिक संस्थांमध्ये प्रतिभावान मनुष्यबळ टिकवून ठेवण्याचे आव्हान वाढत आहे का?

# कर्जमाफीसाठी अ‍ॅग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक बंधनकारक

मुंबई । प्रतिनिधी

**राज्य सरकारच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेण्यासाठी आता शेतकऱ्यांनी आधार कार्ड आणि अ‍ॅग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक बँकेत जमा करणे अनिवार्य करण्यात आले आहे. पात्र शेतकऱ्यांनी हा क्रमांक संबंधित बँकेत सादर केला नाही, तर त्यांना कर्जमाफीची रक्कम तसेच प्रोत्साहनपर लाभ मिळणार नसल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.**

### सरकारचे स्पष्ट निर्देश

राज्य सरकारने शेतकऱ्यांना दिलासा देत यापूर्वीच्या कर्जमाफी योजनेत लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांसाठी असलेली ५० हजार रुपयांची मर्यादा रद्द केली आहे. त्यामुळे आता पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. तसेच, कर्जमाफीची रक्कम प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईपर्यंत १ एप्रिल २०२६ पासून थकीत पीककर्जावर कोणतेही व्याज आकारू नये, असे निर्देश सरकारने सर्व बँकांना दिले आहेत. या महत्त्वाकांक्षी योजनेसाठी राज्य सरकारने ३६,५८५ कोटी रुपयांची तरतूद केली असून, पात्र शेतकऱ्यांची अंतिम यादी जाहीर झाल्यानंतर लाभ वितरणाची प्रक्रिया सुरू होणार आहे. मात्र, त्याआधी प्रत्येक लाभार्थी शेतकऱ्याने अ‍ॅग्रीस्टॅक नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून त्याचा नोंदणी क्रमांक संबंधित बँकेत जमा करणे आवश्यक राहणार आहे. विशेष म्हणजे, अनेक शेतकऱ्यांनी यापूर्वीच

▶▶ पान २ वर




### अ‍ॅग्रीस्टॅक नोंदणी करण्याची पद्धत

अ‍ॅग्रीस्टॅक नोंदणीसाठी सर्वप्रथम आधार क्रमांक मोबाईल क्रमांकाशी लिंक असणे आवश्यक आहे. त्यानंतर शेतकरी स्वतः अ‍ॅग्रीस्टॅक पोर्टलवर जाऊन अथवा जवळच्या महा ई–सेवा केंद्रात जाऊन नोंदणी करू शकतात. नोंदणीसाठी आधार कार्ड, सातबारा/गट क्रमांक आधारशी लिंक असलेला मोबाईल क्रमांक, पोर्टलवर आधार क्रमांक टाकल्यानंतर मोबाईलवर ओटीपी येतो. ओटीपीची पडताळणी झाल्यानंतर सातबारा किंवा गट क्रमांक भरून नोंदणी पूर्ण केली जाते. त्यानंतर शेतकऱ्याला अ‍ॅग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक मिळतो. हा क्रमांक संबंधित बँकेत जमा करणे आवश्यक आहे. सरकारच्या या निर्णयामुळे कर्जमाफी प्रक्रियेत पारदर्शकता वाढण्यास मदत होणार असून, पात्र लाभार्थ्यांची अचूक ओळख पटवून निधी थेट त्यांच्या खात्यात जमा करण्यास सुलभता मिळणार आहे. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांनी विलंब न करता अ‍ॅग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण करून नोंदणी क्रमांक बँकेत सादर करावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## थोडक्यात...

### समृद्धी महामार्गावर सहा ठार: तिघे एकाच कुटुंबातील

वर्धा: समृद्धी महामार्गावर ट्रकने कारला धडक दिल्याने घडलेल्या भीषण अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला. हा भीषण अपघात विरुळ शिवारात २० जुलै रोजी पहाटेच्या सुमारास घडला. या अपघातात सालोड (हिरापूर) येथील एका कुटुंबातील तीन जण, कारचालक तसेच ट्रकचालक, क्लिनरचा समावेश आहे. मिळालेल्या माहितीनुसार, छिंदवाडा येथून इथेनॉल भरलेला टँकर समृद्धी महामार्गाने पुण्याच्या दिशेने जात होता. दरम्यान, विरुळलगतच्या शिवारात इथेनॉल भरलेला टँकर उलटला. त्यामुळे या मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली. मुंबई – नागपूर दिशेने टप्प्याटप्प्याने वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू होते. यादरम्यान, नागपूर कॅरिडोरमध्ये नागपूर दिशेने जात असलेल्या आयसर ट्रकने पुढे उभ्या असलेल्या कारला मागाहून जोरदार धडक दिली

### दुसऱ्या धर्मातल्या मैत्रिणीला भेटायला गेलेल्या तरुणाला अमानुष मारहाण

हरिद्वार: हरिद्वारमध्ये आंतरधर्मीय मैत्रीवरून अत्यंत धक्कादायक आणि अमानुष प्रकार समोर आला आहे. परधर्मीय मैत्रिणीला तिच्या घरी भेटायला गेलेल्या मुस्लिम तरुणाला १० ते १२ जणांच्या जमावाने घरात घुसून बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. क्रूरतेची सीमा ओलांडत या जमावाने तरुणाच्या गळ्यात कुत्र्याचा पट्टा बांधून त्याला अमानुष मारहाण केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी पीडित महिलेच्या तक्रारीनंतर पोलिसांनी १० हून अधिक जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू केला आहे. मूळची लखनौची असलेली ही तक्रारदार महिला जवळपास एक दशकापासून हरिद्वारमध्ये राहत आहे. घटनेच्या व्हिडिओमध्ये दिसत आहे की, आरोपी पीडित व्यक्तीची चौकशी करत असताना, त्याला एका घरासमोर बसवून त्याच्या गळ्यात कुत्र्याचा पट्टा बांधण्यात आला होता.

### राज्यात ५ हजार अंगणवाडी पदांसाठी आजपासून अर्ज प्रक्रिया

मुंबई: महिला व बालविकास विभागामार्फत राज्यभरात ४,९४३ अंगणवाडी पदांसाठी मेगाभरती सुरू झाली आहे. या भरतीत १,०१५ अंगणवाडी सेविका आणि ३,९२८ अंगणवाडी मदतनीस पदांचा समावेश असून, पात्र महिला उमेदवारांना २० जुलै ते ३१ जुलै २०२६ दरम्यान अर्ज करता येणार आहे. निवड झालेल्या सेविकांना दरमहा १३,०००, तर मदतनीसांना ७,५०० रुपये मानधन दिले जाणार आहे. अर्जांची छाननी ३ ते ७ ऑगस्ट, गुणवत्ता यादी पडताळणी १० ते १२ ऑगस्ट, हरकती १३ ते २६ ऑगस्ट दरम्यान स्वीकारल्या जातील. अंतिम गुणवत्ता यादी जाहीर करून २७ ऑगस्ट २०२६ रोजी नियुक्तीपत्रे वितरित केली जाणार आहेत. अर्ज करण्यापूर्वी अधिकृत जाहिरातीतील पात्रता, वयोमर्यादा आणि आवश्यक कागदपत्रांची माहिती तपासण्याचे आवाहन करण्यात आले.

# दिल्लीतील आंदोलकावर लाठीचार्ज

## देशातील राजकीय वातावरण तापले, विरोधकांच्या संतप्त प्रतिक्रिया



मुंबई । प्रतिनिधी

**जंतर–मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थी, पालक आणि इतर आंदोलकांवर पोलिसांनी लाठीचार्ज केल्यानंतर देशातील राजकारण तापले आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तातडीने राजीनामा द्यावा अन्यथा हे आंदोलन सरकारच्या शेवटाची सुरुवात ठरेल असे म्हणत राष्ट्रवादी शरदपवार गट आक्रमक झाला आहे.**

जंतर–मंतर येथे सोमवारी 'कॉकरोच जनता पार्टी'च्या निदर्शकांवर पोलिसांनी लाठीचार्ज केला. यात अनेक जण जखमी झाले असून, काहींच्या डोक्याला दुखापत झाली आहे. जंतर–मंतर

▶▶ पान २ वर

### नि:शस्त्रांवर लाठीमार–सीजेपीचा आरोप

या संपूर्ण कारवाईवर कॉकरोच जनता पार्टीने तीव्र संताप व्यक्त केला आहे. पोलिसांनी शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या नि:शस्त्र कार्यकर्त्यांवर अमानुष लाठीमार केल्याचा आरोप पक्षाने केला आहे. दरम्यान, पक्षाचे नेते अभिजीत दीपके यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याचा दावा आधी करण्यात आला होता, मात्र नंतर पोलीस आणि सीजेपी या दोन्ही बाजूंनी या वृत्ताचा इन्कार केला.

### आंदोलकांना करंट दिल्याचा अत्यंत गंभीर आरोप

राजधानी दिल्लीमध्ये कॉकरोच जनता पार्टीकडून पुकारण्यात आलेल्या चलो संसद आंदोलन चिरडण्याचा प्रयत्न दिल्ली पोलिसांकडून झाल्याने आंदोलक सैरभैर झाले. दिल्ली पोलिसांनी सकाळीच मोर्चाला सुरू होण्यापूर्वी बळाचा वापर करताना अमानुष मारहाण केली होती. त्यानंतर आंदोलकांना करंट सुद्धा दिल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे. अनेक आंदोलकांनी बॅरिकेड्सना हात लावल्यानंतर करंट बसल्याचा गंभीर आरोप केला. या संदर्भात काही पत्रकारांनी पोलिसांना विचारले असता पोलिसांनी त्यावरती कोणतही उत्तर न देता बाजूला व्हा, बाजूला व्हा अशा पद्धतीने उत्तर दिली. त्यामुळे दिल्लीमध्ये दिल्ली पोलिसांची दमनशाही सुरू आहे का? असा सुद्धा प्रश्न उपस्थित झाला आहे.

### जेपी नड्डा– कॉकरोच जनता पार्टीमध्ये चर्चा

आंदोलनादरम्यान कॉकरोच जनता पार्टीच्या (सीजेपी) प्रतिनिधी मंगळवारी केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी नीट–यूजी पेपरफुटी प्रकरणी सरकारने जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी करणारे निवेदन त्यांना सादर केले. सीजेपी नेते आशुतोष रांका आणि सौरव दास यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांन केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांच्याकडे तीन प्रमुख मागण्या केल्या आहेत. यात सोनम वांगचुक यांची सुटका करावी, धर्मेंद्र प्रधान यांनी शिक्षण मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा आणि जीवन संपवलेल्या नीट परीक्षार्थींच्या कुटुंबीयांना १ कोटी रुपयांची भरपाई देण्याच्या मागणीचा समावेश आहे.

## राम मंदिर प्रकरणी राजकारण करू नका–सर्वोच्च न्यायालय




दिल्ली । वृत्तसंस्था

अयोध्या येथील राम मंदिर देणगी कथित चोरी प्रकरण केवळ गुन्ह्याचा विषय आहे, असे निरीक्षण नोंदवत या प्रकरणाचे राजकारण केले जाऊ नये. देणगी अपहार प्रकरणाची योग्य चौकशी सुनिश्चित करणे, हीच न्यायालयाची भूमिका असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी (दि.२०) स्पष्ट केले.

अयोध्या येथील राम मंदिरासाठी मिळालेल्या देणगीतील कथित चोरी प्रकरणाची न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशी व्हावी, अशी मागणी करणार्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. या याचिकांमध्ये सीबीआय च३ौकशी, फॉरेन्सिक ऑडिट आणि श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टच्या खात्यांचे कॅगद्वारे लेखापरीक्षण करण्याची मागणी करण्यात आली होती. सुनावणीदरम्यान खंडपीठाने म्हटले की, ''हे केवळ गुन्हा घडल्याचे प्रकरण आहे. आम्ही येथे केवळ योग्य चौकशी सुनिश्चित करण्यासाठी आहोत. न्यायालये ही राजकारणाची जागा नव्हेत.'' तसेच, संबंधित पक्षांनी या

▶▶ पान २ वर

# अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी संसदेत प्रचंड गदारोळ

## नीट पेपरफुटी, राम मंदिरातील दान चोरीच्या मुद्यावरुन विरोधक आक्रमक

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला सोमवारी सुरुवात झाली. पण अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी लोकसभेत विरोधकांनी अयोध्येतील राम मंदिरातील दान चोरी प्रकरणाचा मुद्दा उपस्थित केला. यावरून जोरदार गदारोळ झाल्याने लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना अनेकवेळा सभागृहाचे कामकाज तहकूब करावे लागले. तसेच राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी राज्यसभेत नीट पेपरफुटी प्रकरण आणि तरुणांच्या आंदोलनाचा प्रकरणाचा मुद्दा उपस्थित केला. राज्यसभेतही गदारोळ



दिसून आला. त्यानंतर विविध मुद्द्यांवरून विरोधकांचा गोंधळ सुरुच राहिल्याने लोकसभा आणि राज्यसभेचे कामकाज दुपारी दिवसभरासाठी कामकाज तहकूब करावे लागले.

लोकसभेत प्रश्नोत्तराचा तास सुरू होताच, विरोधी पक्षांचे खासदार वेलमध्ये आले आणि त्यांनी राम मंदिरातील दान चोरी प्रकरणी चर्चेची मागणी केली. यामुळे मोठा गोंधळ सुरू केला. त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. विरोधकांच्या गदारोळानंतर अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सदस्यांना सभागृहाच्या परंपरेचे पालन करावे, असे आवाहन केले. सभागृहाचे कामकाज चालू राहू द्यावे. सर्वांना बोलण्याची संधी दिली जाईल, असे म्हणत त्यांनी प्रश्नोत्तराचा तास सुरू ठेवण्याची सूचना केली. तरीही विरोधकांचा गदारोळ सुरूच राहिला. यामुळे त्यांनी काहीवेळ कामकाज तहकूब केले. मल्लिकार्जुन खर्गे यांनी राज्यसभेत बोलताना नीट पेपरफुटी आणि परीक्षेतील घोटाळ्याबाबत

▶▶ पान २ वर

# तुकाराम मुंढे यांना हायकोर्टाचा झटका!

## पंचतारांकित हॉटेलवरील कारवाईवरून 'एफडीए' ला फटकारले

मुंबई । प्रतिनिधी

**नवी मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलवर अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या कारवाईप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने एफडीएच्या कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा कठोर शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे.**

नियमांचे उल्लंघन झाल्यास कारवाई करण्याचा अधिकार प्रशासनाला असला, तरी संबंधित आस्थापनाला आपली बाजू मांडण्यासाठी आणि आवश्यक ती पूर्तता



करण्यासाठी योग्य वेळ देणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने सुनावणीदरम्यान एफडीएच्या मनमानी पद्धतीवर ताशेरे ओढले. नियमांची अंमलबजावणी करताना प्रशासनाने संवेदनशीलता आणि जबाबदारीचे भान ठेवले पाहिजे. अचानक परवाना निलंबित केल्यामुळे संबंधित व्यवसायाचे मोठे

▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२० जुलै २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: १९९.५० क्विंटल | २,६३१ | ३,६०० | २,७५० |
| ज्वारी/हायब्रिड: २०८.५० क्विंटल | २,५०७ | ५,५०२ | ३,४३३ |
| मका/लोकल: २१.०० क्विंटल | २,२९० | २,२९० | २,२९० |
| तूर : २.०० क्विंटल | ७,१०० | ७,१०० | ७,१०० |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ५८.५० क्विंटल | २,२६० | २,८१० | २,६०४ |
| मुग: १.०० क्विंटल | ७,०६० | ७,०६० | ७,०६० |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ५,३६० | ५,३६० | ५,३६० |

# प्रा.हाके यांच्या नव्या पक्षासमोर आव्हाने आणि राजकीय समीकरणे

बीड –मुंबई । प्रतिनिधी

**राजकीय वर्तुळात खळबळ उडवून देत ओबीसी नेते प्राध्यापक लक्ष्मण हाके यांनी रविवारी बारामती येथे ओबीसी जनता पार्टी या नवीन राजकीय पक्षाच्या नावाची अधिकृत घोषणा केली. ओबीसी आरक्षणाचा लढा तीव्र करणाऱ्या हाके यांनी आता थेट राजकीय मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, राजकीय पटलावर हा नवीन पक्ष कितपत टिकेल आणि प्रभाव पाडेल, याबाबत राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे.**

फोकस...

बारामतीमधील सभेत बोलताना प्राध्यापक लक्ष्मण हाके यांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेतली. भाजप हा ओबीसी आमचा डीएनए असल्याचे एका बाजूला सांगत आहे मात्र ओबीसींच्या अनेक प्रश्नांना सरकारकडून बगल दिली जाते यातच आता हाके यांनी मात्र प्रस्थापित राजकारणावर निशाणा साधत, ''भाजपाचा डीएनए–कारखानदार हाच आहे,'' असा गंभीर आरोप केला. या विधानामधून त्यांनी अप्रत्यक्षपणे सहकार महर्षी आणि

▶▶ पान २ वर



## जि.प.निवडणुका सुप्रीम कोर्टाची आयोगाला नोटीस



दिल्ली । वृत्तसंस्था

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा कार्यकाळ संपून ५०६ दिवस उलटले तरीही अद्याप निवडणुका न झाल्याने सर्वोच्च न्यायालयाने दखल घेतली आहे. संबंधित जिल्हा परिषदांमध्ये तातडीने निवडणूक कार्यक्रम जाहीर करावा, तसेच ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण असलेल्या जागा खुला प्रवर्ग म्हणून गृहीत धरून निवडणुका घ्याव्यात, या मागणीसाठी दाखल करण्यात आलेल्या य३ाचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने नुकतीच महाराष्ट्र राज्य सरकार आणि राज्य निवडणूक आयोगाला नोटीस बजावून उत्तर सादर करण्याचे

▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# शास्त्रज्ञांचे राजीनामे : विज्ञानासाठी इशारा की ..?

भारताने गेल्या काही वर्षांत अंतराळ संशोधनात अभूतपूर्व यश मिळवले आहे. चांद्रयान-३, आदित्य-एल१, गगनयानची तयारी आणि आगामी महत्त्वाकांक्षी मोहिमांमुळे भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (इस्रो) जगभरात वेगळी ओळख निर्माण केली आहे. या यशामुळे प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटतो. मात्र, याच काळात इस्रोतील अनेक शास्त्रज्ञांनी राजीनामे दिल्याच्या वृत्तांमुळे एक गंभीर प्रश्न समोर आला आहेभारतातील सर्वोच्च वैज्ञानिक संस्थांमध्ये प्रतिभावान मनुष्यबळ टिकवून ठेवण्याचे आव्हान वाढत आहे का? जर अनुभवी वैज्ञानिक मोठ्या प्रमाणात संस्था सोडत असतील, तर त्यामागील कारणांचा सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे. केवळ खासगी क्षेत्रातील अधिक वेतन, जागतिक रोजगाराच्या संधी किंवा करिअरमधील प्रगती हीच कारणे आहेत, की संस्थात्मक पातळीवरही काही सुधारणा आवश्यक आहेत, याचे उत्तर वस्तुनिष्ठपणे शोधले गेले पाहिजे.

अंतराळ क्षेत्रात खासगी उद्योग झपाट्याने वाढत आहेत. त्यामुळे सरकारी संशोधन संस्थांतील वैज्ञानिकांना अधिक आकर्षक संधी उपलब्ध होणे स्वाभाविक आहे. मात्र, याचा अर्थ असा नाहइी की राष्ट्रीय संशोधन संस्थांमधील अनुभवी मनुष्यबळ गमावणे ही सामान्य बाब मानली जावी. गगनयान, भारतीय अंतराळ स्थानक, चांद्रयान-४ आणि भविष्यातील मोहिमांसाठी अनुभवी वैज्ञानिकांचे योगदान अमूल्य आहे. इतिहास पाहिला तर स्वातंत्र्योत्तर काळात मर्यादित संसाधने असूनही भारताने वैज्ञानिक संस्था उभारण्याला प्राधान्य दिले. डॉ.होमी भाभा, डॉ. विक्रम साराभाई यांसारख्या वैज्ञानिकांच्या नेतृत्वाखाली संशोधनाची भक्कम पायाभरणी झाली. त्या काळातील परिस्थिती आणि आजचा जागतिक रोजगार बाजार वेगळा असला, तरी संशोधन संस्थांना सक्षम मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची जबाबदारी आजही तितकीच महत्त्वाची आहे. सरकारने अंतराळ क्षेत्रासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली असून अनेक ऐतिहासिक मोहिमा यशस्वी झाल्या आहेत. या यशाचे श्रेय धोरणकर्ते, अभियंते, तंत्रज्ञ आणि शास्त्रज्ञ या सर्वांनाच जाते. त्यामुळे या यशाचा पाया अधिक मजबूत करण्यासाठी वैज्ञानिकांना टिकवून ठेवणे, रिक्त पदे वेळेत भरणे, संशोधनासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे आणि स्पर्धात्मक करिअर वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे.ङ्गया पार्श्वभूमीवर काही प्रश्न उपस्थित होतात. राजीनाम्यांची नेमकी कारणे काय आहेत? रिक्त पदे कितपत भरली जात आहेत? अनुभवी वैज्ञानिक संस्थेत टिकून राहावेत यासाठी कोणती दीर्घकालीन धोरणे आखली जात आहेत? या प्रश्नांची उत्तरे मिळणे हे सरकार, इस्रो प्रशासन आणि नागरिक या सर्वांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. लोकशाहीत प्रश्न विचारणे म्हणजे संस्थांवर अविश्वास व्यक्त करणे नव्हे; उलट त्यांना अधिक सक्षम आणि उत्तरदायी बनवण्याचा प्रयत्न असतो. भारताची वैज्ञानिक ताकद केवळ यशस्वी रॉकेट प्रक्षेपणांत नाही, तर त्या यशामागे आयुष्य समर्पित करणाऱ्या शास्त्रज्ञांमध्ये आहे. म्हणूनच, वैज्ञानिक प्रतिभा जपणे आणि त्यांना सक्षम कार्यपरिसर उपलब्ध करून देणे ही भविष्यातील भारतासाठी सर्वात मोठी गुंतवणूक ठरणार आहे.

# मुख्यमंत्री महाआरोग्य शिबीराचे आयोजन

## शिबिराच्या यशस्वीतेसाठी सर्व विभागांनी समन्वयाने कामे करावीत-जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यात ६ व ७ ऑगस्ट २०२६ रोजी आष्टी येथील अनिषा ग्लोबल स्कूल मैदानावर मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रुग्णांची यादी तयार करताना आशा कार्यकर्त्या आणि अंगणवाडी सेविकांची मदत प्राधान्याने घेण्यात यावी. तसेच या शिबिरामुळे जिल्ह्यातील हजारो रुग्णांना मोफत उपचार मिळण्यास मदत होणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त गरजू रुग्णांपर्यंत वैद्यकीय मदत पोहोचविण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने कामे करावीत. असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले.**

मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिराची पूर्वतयारी आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात आज पार पडली. या बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे राज्य समन्वयक रितेश पाटील, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागेश चव्हाण, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.शेख रौफ, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष जिल्हा प्रमुख



डॉ.चैतन्य कागदे यांच्यासह आरोग्य तसेच महिला व बालविकास विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिराच्या आयोजनामध्ये केंद्र शासन आणि राज्य शासन पुरस्कृत विविध आरोग्य विषयक योजनांबाबत व्यापक जनजागृती, जनप्रबोधन तसेच चिकित्सा सेवा आदिचा समावेश असणार आहे. त्यामुळे या शिबिराच्या यशासाठी पूर्वतयारी अत्यंत महत्त्वाची असून, पदनिहाय विविध समित्या स्थापन करून जबाबदाऱ्यांचे वाटप करावे, तसेच दररोज माहिती अद्ययावत करावी. आणि दि.२२ जुलै २०२६ रोजी चांगला कार्यक्रम पार पाडावा, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. मुख्यमंत्री महाआरोग्य शिबीरासाठी मुख्यमंत्री सहायता निधी कक्षासह संलग्नित असलेली सर्व रुग्णालये, धर्मादाय रुग्णालये, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना संलग्नित रुग्णालये, जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्त असलेली रुग्णालये व स्टेमी तसेच एचएलएच यंत्रणा, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ संलग्नित सर्व वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये, अन्न व औषधी प्रशासन आणि जिल्ह्यातील सर्व सेवाभावी संस्था इत्यादी यंत्रणांचे सहकार्य घेवून मुख्यमंत्री महाआरोग्य शिबीराचे आयोजन कर ण्यात येणार आहे. या शिबीराचे संयोजक आमदार सुरेश धस हे असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त शिबीराचे आयोजन करण्यात येणार आहे. अशी माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे राज्य समन्वयक रितेश पाटील यांनी यावेळी दिली. मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिराचे तीन टप्पे पाडण्यात आले असून प्रथम टप्प्यात निदान झालेल्या रुग्णांची यादी तयार कर ण्यात येणार आहे. दुसऱ्या टप्प्यात नवीन रुग्णांच्या तपासण्या करुन निदान करावयाचे आहे. तर तिसऱ्या टप्प्यात प्रत्यक्ष दि. ६ व ७ ऑगस्ट २०२६ रोजी आष्टी येथील अनिषा ग्लोबल स्कूल मैदानावर मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिराचे आयोजन केले जाणार आहे. या मुख्य शिबिरात नाव नोंदणी विभाग, प्राथमिक तपासणी विभाग, नाक-कान-घसा विभाग, श्वसन रोग विभाग, नेत्रविकार विभाग, होमिओपॅथी विभाग, आयुर्वेद विभाग, फिजिओथेरेपी विभाग, मेडिसीन विभाग, हिरकणी कक्ष, रक्त संकलन विभाग, मेंदू विकार विभाग, कृत्रिम अवयव विभाग, त्वचा रोग विभाग, अस्थिरोग विभाग, अस्थिरोग विभाग, स्त्रिरोग विभाग, हृदय रोग विभाग, बालरोग विभाग, जनरल सर्जरी विभाग, दंतरोग विभाग, कर्करोग विभाग, मानसिक रोग विभाग, मुत्र विकार विभाग, किडणी रोग विभाग, प्राथमिक तपासणी (महिला), चौकशी कक्ष आणि रुग्ण संदर्भित कक्ष आदि विभाग शिबिराच्या मुख्य ठिकाणी असणार आहेत. असेही यावेळी सांगितले.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मंत्री पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त २२ जुलैला चित्रकला स्पर्धा

**परळी वै.। प्रतिनिधी**



**महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस तसेच पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा लोकप्रिय लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, त्याअंतर्गत बुधवार, दि. २२ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता जिजामाता उद्यान, परळी वैजनाथ येथे विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.**

स्पर्धा दोन गटांत होणार असून, पहिल्या गटात इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी 'रंग भरण' स्पर्धा घेण्यात येणार आहे. तर दुसऱ्या गटात इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी पर्यावरण, जलसंवर्धन काळाची गरज, 'जल है तो कल है', स्मरणचित्र आणि पशुसंवर्धन या विषयांवर चित्रकला स्पर्धा होणार आहे. स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम क्रमांकासाठी ₹५,०००, द्वितीय क्रमांकासाठी ₹३,००० आणि तृतीय क्रमांकासाठी ₹२,००० अशी रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत. तसेच स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. या स्पर्धेत परळी शहर व परिसरातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन स्पर्धेचे आयोजक तथा भाजयुमो शहराध्यक्ष सुशील हरंगुळे यांनी केले आहे.

# नवीन झालेली महानगरपालिकेत नगरसेवकांचा तमाशा ?

**जालना । प्रतिनिधी**

महानगरपालिके च्या सर्वसाधारण सभेत तमाशा पेक्षा ही भयंकर प्रकार घडला व झालेल्या गोंधळ आणि नगरसेवकांच्या गैरवर्तनप्रकरणी महापौर ❊वंदना मगरे यांनी सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील नगरसेवकांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. सभेचे थेट प्रक्षेपण असल्याने नागरिकांनी नगरसेवकांचे वर्तन थेट पाहिले. या प्रकरणावर भाष्य करताना ॲड. महेश धन्नावत म्हणाले, महापौर वंदना मगरे यांनी नोटीस देऊन योग्य सुरुवात केली आहे. मात्र येथेच थांबून चालणार नाही. सभागृहाची प्रतिष्ठा धुळीस मिळवणाऱ्या नगरसेवकांवर कठोर आणि दाखलपात्र कारवाई करणे आवश्यक आहे. कारणे दाखवा नोटीस हा फक्त पहिला टप्पा आहे, पुढील प्रक्रिया तातडीने राबवली पाहिजे. ते पुढे म्हणाले,




''जेव्हा महापौरपदी एक महिला आहे, तेव्हा नगरसेवकांनी अधिक सजग राहून नैतिकतेने वागणे अपेक्षित आहे. सभागृह हे जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी आहे, वैयक्तिक हेवेदावे आणि आरडाओरडा करण्यासाठी नाही. असे वर्तन शहराच्या प्रतिमेला काळिमा लावणारे आहे. सभेचे ऑनलाइन प्रक्षेपण असल्यामुळे शाळा-कॉलेजमधील तरुण-तरुणी आणि महिलांनी देखील हे सर्व पाहिले. याबत ॲड. धन्नावत म्हणाले, ''लोकप्रतिनिधींचे हे वर्तन पाहून तरुण पिढी आणि महिलांच्या मनात काय विचार आला असेल? आपण ज्यांना निवडून देतो ते असेच वागतात का, असा प्रश्न त्यांना पडला असेल. हा लोकशाहीसाठी आणि शहरासाठी अत्यंत लज्जास्पद प्रकार आहे.' महापालिकेच्या कामकाजात शिस्त आणण्यासाठी केवळ नोटीस पुरेशी नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. ''निलंबन, विशेषाधिकार भंगाची कारवाई अशा पुढील पावलांवर महापौरांनी विचार करावा. अन्यथा अशा नोटीसांचा कोणताही धाक राहणार नाही आणि भविष्यात पुन्हा असेच प्रकार घडतील,'' असे ॲड. धन्नावत यांनी सांगितले. नगरसेवकांनी आपापसातील मतभेद बाजूला ठेवून जालना शहरातील पाणी, रस्ते, आरोग्य आणि स्वच्छतेसारख्या मूलभूत प्रश्नांवर लक्ष केंद्रित करावे, असे आवाहन त्यांनी केले. शेवटी ते म्हणाले, ''जनतेने मोठ्या अपेक्षेने नगरसेवकांना निवडून दिले आहे. त्यांच्या विश्वासाला तडा जाणार नाही याची सर्वांनी काळजी घ्यावी. महापौरांनी या प्रकरणी केलेली कारवाई ही केवळ दिखाऊ नसून ती तार्किक निष्कर्षापर्यंत नेली पाहिजे.'

# जिल्ह्यात २२ जुलै ते २ ऑगस्टदरम्यान 'समाधान शिबिर' अभियान

**जालना । प्रतिनिधी**

**शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' अंतर्गत राज्यभर २२ जुलै ते २ ऑगस्ट, २०२६ या कालावधीत प्रत्येक विधानसभा मतदारसंघात 'समाधान शिबिर' आयोजित करण्यात निर्देश देण्यात आले आहेत. मुख्यमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या प्रथम जयंतीचे औचित्य साधुन या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जालना जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांमध्ये शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.**

प्रत्येक विधानसभा मतदारसंघासाठी एका वरिष्ठ अधिकाऱ्याची मुख्य नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, शिबिरांचे नियोजन, समन्वय, अंमलबजावणी, पर्यवेक्षण आणि अहवाल सादर करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. जालना जिल्ह्यातील समाधान शिबिरांचे वेळापत्रक परतूर-मंठा



विधानसभा मतदारसंघ : २२ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता गजानन मंगल कार्यालय, परतूर येथे शिबिर होणार असून उपविभागीय अधिकारी श्री. प्रभाकर गायकवाड हे मुख्य नोडल अधिकारी असतील. भोकरदन-जाफराबाद विधानसभा मतदारसंघ : २२ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता समृध्दी लॉन्स, भोकरदन येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले असून उपविभागीय अधिकारी श्रीमती सुकेशिनी कांबळे-पगारे यांच्याकडे नोडल अधिकारी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. घनसावंगी विधानसभा मतदारसंघ : २३ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता नृसिंह मंगल कार्यालय, घनसावंगी येथे शिबिर होणार असून उपविभागीय अधिकारी श्री. उमाकांत पारधी हे नोडल अधिकारी राहतील. जालना विधानसभा मतदारसंघ : २६ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता मुक्तेश्वर लॉन्स (मनपा), जालना येथे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. उपविभागीय अधिकारी श्री. रामदास दौंड यांची मुख्य नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. बदनापूर-अंबड विधानसभा मतदारसंघ : ३१ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता कृषी उत्पन्न बाजार समिती मागील मैदान, बदनापूर येथे शिबिर होणार असून तहसीलदार श्री. एस. एच. हंडेश्वर यांच्याकडे नोडल अधिकारी म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली आहे. राज्य शासनाच्या निर्देशानुसार या शिबिरांमध्ये नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याबरोबरच प्रमाणपत्रे, महसूल विषयक सेवा तसेच इतर विभागांच्या सुविधा व इतर विभागांशी संबंधित प्रलंबित प्रकरणांचा निपटारा, अर्ज स्वीकृती, मार्गदर्शन आणि विविध सेवा देण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## पान १ वरून...

### कर्जमाफीसाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी

ॲग्रीस्टॅक नोंदणी केली असली तरी त्यांनी नोंदणी क्रमांक बँकेत सादर केलेला नाही. अशा शेतकऱ्यांनी तातडीने आपल्या पीककर्ज खात्याच्या शाखेत जाऊन हा क्रमांक जमा करावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. हा क्रमांक बँकेच्या नोंदीत नसल्यास कर्जमाफीची रक्कम खात्यात जमा होणार नाही, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

-------

### राम मंदिर प्रकरणी राजकारण

मुद्द्याचे राजकारण करू नये, असेही न्यायालयाने बजावले. राम मंदिर देणगीतील कथित अपहाराची चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक स्थापन करता येईल का, याबद्दल सूचना घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांना सांगितले.यावर उत्तर देताना सॉलिसिटर जनरल यांनी सांगितले की, एसआयटीची स्थापना आधीच करण्यात आली असून उत्तर प्रदेश पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी २७ जुलै रोजी निश्चित करण्यात आली आहे; त्या दिवशी उत्तर प्रदेश सरकार एसआयटीच्या तपासाच्या प्रगतीबाबत न्यायालयाला माहिती देईल. एसआयटीने अंतरिम अहवाल सादर केल्यानंतर तपासाला गती मिळाली आहे. या अहवालामुळे एफआयआर दाखल करणे, आठ आरोपींना अटक करणे आणि मंदिराच्या देणगीतून कथितरीत्या हडप केलेले सुमारे ८० लाख रुपये हस्तगत करणे शक्य झाले. या तपासामुळे ट्रस्टचे माजी सरचिटणीस चंपत राय आणि माजी विश्वस्त अनिल मिश्रा यांना राजीनामे द्यावे लागले होते. दरम्यान, सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अंतिम अहवाल सादर करण्यापूर्वी आर्थिक नोंदी, प्रशासकीय प्रक्रिया आणि कथित अनियमितता यांची तपासणी करण्यासाठी एसआयटीने अतिरिक्त वेळ मागितला आहे. या अहवालात मंदिराची देणगी संकलन, मोजणी आणि प्रशासकीय प्रणालींमध्ये सुधारणा करण्याची शिफारस केली जाण्याची शक्यता आहे. सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकांमध्ये राज्याकडून सुरू असलेल्या तपासाच्या पर्याप्ततेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. तसेच, न्यायालयाच्या देखरेखीखाली सीबीआय चौकशी, फॉरेन्सिक ऑडिट आणि ट्रस्टच्या आर्थिक व्यवहारांचे कॅग द्वारे लेखापरीक्षण करण्याची मागणी करण्यात आली आहे.

---------

### दिल्लीतील आंदोलकावर

परिसरातील परिस्थिती आणि आंदोलनादरम्यान नेमके काय घडले याबाबत वेगवेगळे दावे समोर येत असून, या प्रकरणावरून राजकीय आरोप-प्रत्यारोप अधिक तीव्र झाले आहेत. आंदोलकांनी बॅरिकेड्स तोडून संसदेच्या दिशेने कूच करण्याचा प्रयत्न केल्यानंतर पोलिसांनी आंदोलकांवर जोरदार लाठीमार केला आणि अश्रूधुराच्या नळकांड्या सोडल्या. या चकमकीत अनेक आंदोलक जखमी झाले असून, पोलिसांनी जंतर-मंतर येथील आंदोलकांचे मंच आणि तंबू उखडून टाकत परिसर रिकामा केला आहे. दरम्यान, निदर्शकांशी झालेल्या संघर्षात ५० हून अधिक पोलीस कर्मचारी जखमी झाले असल्याचा दावा दिल्ली पोलिसांनी केला आहे.

**हुकूमशाहीची नांदी – प्रकाश आंबेडकर**

वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या नागरिकांवर बळाचा वापर केला जात असेल आणि मतभेद दडपण्याचा प्रयत्न होत असेल, तर तो लोकशाही नव्हे तर हुकूमशाहीचा मार्ग आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांशिवाय राजकीय लोकशाही टिकू शकत नाही, असे स्पष्टपणे सांगितले होते. सत्तेला प्रश्न विचारणे, उत्तरदायित्वाची मागणी करणे आणि शांततेच्या मार्गाने मतभेद व्यक्त करणे हा प्रत्येक नागरिकाचा लोकशाहीतील मूलभूत अधिकार आहे. लोकशाहीची खरी परीक्षा सहमतीमध्ये नसून मतभेदांना सरकार कशा पद्धतीने प्रतिसाद देते, यावर ठरत असते, असेही त्यांनी म्हटले.

--------------

### तुकाराम मुंढे यांना

नुकसान होऊ शकते, याची जाणीव प्रशासनाने ठेवणे गरजेचे असल्याचे न्यायालयाने नमूद केले. यावेळी न्यायालयाने एक महत्त्वपूर्ण प्रश्नही उपस्थित केला. एखाद्या रुग्णालयाचा परवाना तत्काळ रद्द किंवा निलंबित केला तर उपचार सुरू असलेले रुग्ण हातात सलाईन घेऊन बाहेर पडायचे का? अशा परिस्थितीत प्रशासनाने परिणामांचा विचार करणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. या प्रकरणात एफडीएच्या अधिकाऱ्यांनी २ जुलै रोजी हॉटेलची तपासणी केली होती. त्यानंतर अवघ्या दुसऱ्याच दिवशी हॉटेलचा परवाना निलंबित करण्यात आला आणि अन्न व्यवसाय तात्काळ बंद करण्याचे आदेश देण्यात आले. त्यामुळे हॉटेलला त्वरित सेवा बंद करावी लागली होती. हॉटेल व्यवस्थापनाने न्यायालयात सांगितले की, सर्व आवश्यक नियमांची पूर्तता करण्यात आली असून एफडीएने नव्याने तपासणी करून परवाना निलंबित करण्याचा निर्णय मागे घ्यावा. यावर एफडीएने शनिवार-रविवारमुळे तातडीने तपासणी शक्य नसल्याचे सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र न्यायालयाने हा युक्तिवाद फेटाळून लावत, ''कारवाई करताना वार पाहून निर्णय घेतला जातो का?'' असा सवाल उपस्थित केला. तसेच एफडीए आयुक्त कार्यालयाला संबंधित हॉटेलची तातडीने नव्याने तपासणी करून पुढील निर्णय घेण्याचे निर्देश दिले.

----------

### अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी

मत व्यक्त केले. हा विद्यार्थ्यांशी संबंधित विषय आहे; मी लाखो मुलांच्या भविष्याबद्दल बोलत आहे. यासाठी हजारो विद्यार्थी जंतर- मंतरवर जमले आहेत. तिथे त्यांच्यावर लाठीचार्ज झाला. सरकार बळाचा वापर करुन त्यांचा आवाज दडपण्याचा आणि त्यांना तेथून हटवण्याचा प्रयत्न करत आहे, असा आरोप त्यांनी केला. दरम्यान, संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. मॉन्सून असो वा मॉन्सून सत्र असो, जर दोन्ही सक्रिय असतील तर ते खूप फलदायी ठरतात. यामुळे देशाचे कल्याण होते. त्यामुळे मॉन्सूनही सक्रिय राहावा आणि पावसाळी अधिवेशनही फलदायी राहावे अशी आम्ही प्रार्थना करतो, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

-------------

### जि.प.निवडणुका सुप्रीम

आदेश दिले आहेत. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने नुकतेच हे आदेश दिले. जिल्हा परिषद निवडणुकांसंदर्भात धुळे जिल्हा परिषदेच्या कुसुंबे गटाचे माजी निर्वाचित सदस्य संग्राम गोविंदराव पाटील यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. ही याचिका राज्यघटनेच्या कलम ३२ अन्वये दाखल करण्यात आली असून, यात असा युक्तिवाद करण्यात आला आहे की, १६ जानेवारी २०२५ रोजी निवडून आलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांचा कार्यकाळ संपूनही निवडणुका घेण्यात आलेल्या नाहीत. यात धुळे जिल्हा परिषदेच्या प्रशासनाने ३ ऑक्टोबर २०२५ रोजी तयार केलेल्या आरक्षणाबाबतच्या निवेदनाचा उल्लेख आहे, ज्यामध्ये ५६ पैकी ४१ जागा राखीव ठेवण्यात आल्या होत्या. तसेच, अनेक पंचायत समित्यांमध्ये ८५.७१% पर्यंत जागा राखीव असल्याचेही यात नमूद केले आहे. याचिकाकर्त्याचा असा युक्तिवाद आहे की, महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर टाकणे हे राज्यघटनेच्या भाग ९ मधील नियतकालिक लोकशाही प्रशासनाच्या घटनात्मक तरतुदींचे उल्लंघन करणारे आहे. विकास किशनराव गवळी विरुद्ध महाराष्ट्र राज्य खटल्यातील निकालाचा आधार घेत याचिकेत नमूद केले आहे की, आरक्षणाशी संबंधित वादांमुळे निवडणुका अनिश्चित काळासाठी पुढे ढकलल्या जाऊ शकत नाहीत. तसेच वेळेवर निवडणुका सुनिश्चित करण्यासाठी ५०% पेक्षा जास्त असलेल्या राखीव जागांना खुला प्रवर्ग म्हणून गृहीत धरले जाऊ शकते. गवळी खटल्यात (२०२१), सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ अन्वये दिलेले २७% ओबीसी आरक्षण रद्द केले होते; कारण त्यामुळे आरक्षणाची ५०% ची मर्यादा ओलांडली जात होती. यापुर्वी मे २०२५ मध्ये, सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील स्थानिक स्वराज्य३ संस्थांच्या निवडणुका (ज्या २०२२ पासून पुढे ढकलण्यात आल्या होत्या) घेण्याचे अंतरिम आदेश दिले होते. जुलै २०२२ मध्ये बांठिया आयोगाचा अहवाल सादर होण्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या ओबीसी आरक्षणानुसार निवडणुका घेण्याचे निर्देश देण्यात आले. न्यायमूर्ती सूर्यकांत (जे आता सरन्यायाधीश आहेत) यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने राज्य निवडणूक आयोगाला चार आठवड्यांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची अधिसूचना जारी करण्याचे निर्देश दिले होते. तसेच निवडणूक प्रक्रिया चार महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करण्याचे प्रयत्न करावेत, असेही आदेश देण्यात आले. निवडणूक आयोगाला आवश्यक असल्यास मुदतवाढ मागण्याची मुभा देण्यात आली होती. त्यानंतर, राज्यातील काही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडल्या होत्या.

-----------

### प्रा.हाके यांच्या नव्या पक्षासमोर

प्रस्थापित नेत्यांच्या राजकारणावर कडाडून टीका केली. या सर्व घडामोडींमागे सध्या ओबीसी समाजात असलेली काहीशी नाराजी आणि संतापाची भावना कारणीभूत असल्याचे मानले जात आहे. याच उपेक्षेच्या आणि संघर्षाच्या भावनेतून या नव्या पक्षाची स्थापना झाली आहे. प्राध्यापक लक्ष्मण हाके यांनी सध्या ओबीसी समाजाची मोट बांधण्यात आणि संघटन उभे करण्यात यश मिळवले असले, तरी राजकारणात केवळ घोषणा आणि आंदोलन करून पक्ष टिकत नाही, असा राजकीय विश्लेषकांचा सूर आहे. महाराष्ट्राच्या गुंतागुंतीच्या राजकीय पटलावर केवळ एका जातीच्या किंवा वर्गाच्या जोरावर स्वतंत्र पक्ष दीर्घकाळ टिकवणे अत्यंत कठीण असते. भविष्यात प्राध्यापक हाके यांना आपला पक्ष खऱ्या अर्थाने रुजवायचा असेल आणि त्याला राज्यव्यापी ओळख मिळवून द्यायची असेल, तर त्यांना आगामी काळात काँग्रेस पक्षाची साथ आणि मदत घ्यावी आणि द्यावी लागेल, अशी चर्चा राजकीय विश्लेषकांमध्ये रंगली आहे. अन्यथा, महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात आणखी एका छोट्या प्रादेशिक पक्षाची भर पडली आणि तो काही काळा पुरताच मर्यादित राहिला, अशीच पुनरावृत्ती होईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. आता ओबीसी जनता पार्टी हा पक्ष महाराष्ट्राच्या राजकारणात नवी दिशा ठरवणार की केवळ एका संघर्षाचा आवाज म्हणून राहणारा, हे येणारा काळच ठरवेल.

-----------

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार, दि. २१ जुलै २०२६


## थोडक्यात

### निवडणूक आयोगाने एस. आय.आर. नोंदणी प्रक्रियेसाठी मुदतवाढ द्यावी –प्रा.आंधळे

बीड । प्रतिनिधी



दिनांक २० ७ २०२६ महाराष्ट्रातील सर्व मतदार जनता आषाढी वारी निमित्त जुलै महिन्यामध्ये पंढरपूर या ठिकाणी संपूर्ण महाराष्ट्रामधून दिंड्या निघतात या दिंडीमध्ये सर्व वारकरी समाविष्ट होतात २५ जुलै रोजी आषाढी एकादस आहे या दिवशी सर्व दिंड्या पंढरपूर या ठिकाणी एकत्र येतात आणि वापस आपापल्या गावी दिंड्या येण्यासाठी आठ ते पंधरा दिवसाचा कालावधी लागतो या अडचणीचा विचार करून निवडणूक आयोगाने एसआयआर प्रक्रिया जी निवडणूक विभागामार्फत सुरू आहे त्याला मुदतवाढ देण्याची गरज आहे या प्रक्रियेची मुदत वाढ भारतीय निवडणूक आयोगाने द्यावी असे आव्हान एका प्रसिद्ध पत्रकाद्वारे ग्रामीण युवक संघटनेच्या वतीने करण्यात येत आहे सध्या आषाढी वारी निमित्त महाराष्ट्रातील लाखो भाविक पंढरपूर येथे गेलेले आहेत पंढरपूर येथील वारी संपल्यानंतर सर्व भाविक आपल्या गावाकडे येतील आणि आल्यानंतर या एस.आय.आर. नोंदणीची प्रक्रिया आहे ती वारीमध्ये गेलेल्या मतदारांना यामध्ये सहभागी होता येईल नसता वारीमध्ये गेलेले जे वारकरी आहेत ते एस आय आर नोंदणी मध्ये गणना प्रपत्र भरण्यासाठी वंचित राहतील पंढरपूर वारीचा काळ आणि एस आय आर नोंदणीची शेवटची तारीख ही एकाच दिवशी आल्यामुळे वारीत सहभागी झालेले लाखो मतदार या महत्त्वपूर्ण नोंदणी प्रक्रिये पासून वंचित राहण्याची आणि पर्यायाने आपापल्या मतदानाच्या हक्कापासून दूर राहण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे या गंभीर बाबीकडे लक्ष वेधत लोकशाहीत सर्व नागरिकांना भाविकांना नोंदणीची समान संधी दिली पाहिजे अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकार द्वारे केली आहे



### साहित्यरत्न डॉ. आण्णा भाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्षपदी रोहित पंडित

गेवराई । प्रतिनिधी

सालाबादप्रमाणे याही वर्षी साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी युवा नेते रोहित भैय्या पंडित यांची एकमताने निवड करण्यात आली असून, सामाजिक कार्यकर्ते रंजीत सराटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे.

उपाध्यक्ष – सय्यद एजाज मेंबर, दादासाहेब घोडके, सचिव – अशोक बाबू गायकवाड, सहसचिव :अमजद भाई पठाण, कोषाध्यक्ष :उद्धवजी मडके, अजय भैय्या दाभाडे, सहकोशाध्यक्ष – राधेश्याम दातार, सल्लागार – सुघोष मुंडे ,बाबासाहेब ससाने, प्रसिद्धीप्रमुख जुनेद बागवान ,अमोल वैद्य यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. यावेळी बाळासाहेब सानप,सय्यद शहदाद ,शैलेश तोष्णीवाल ,अरविंद बांगर, ब्रह्मदेव देवा धुरंधरे , ज्येष्ठ पत्रकार सुभाष सुतार, विलास सुतार ,अमन सुतार ,संतोष सुतार,रणजीत खाजेकर ,ॲड सोमेश्वर कारके ,अशोक थोरात ,विशाल थोरात ,विजय सुतार ,प्रदीप सुतार ,कानडे गुरुजी ,राणा कानाडे बंडू पवळे ,राजेंद्र सुतार ,मायकल सुतार ,राहुल सुतार ,उज्वल सुतार, अमोल सुतार ,रजनी सुतार ,विकास सुतार ,कृष्णा पाटोळे ,तीर्थराज धुरंधरे ,सुमित सुतार यांच्यासह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पारधी समाजातील महिलेवर जिवे मारण्याच्या उद्देशाने हल्ला

## गुन्हा नोंद होऊनही आरोपी मोकाटच तलवाडा पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात महिलांवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याची चिंता व्यक्त होत असतानाच, पारधी समाजातील एका सुशिक्षित महिलेवर अमानुष जीवघेणा हल्ला करण्यात आला. त्यामध्ये एक हात फ्रॅक्चर व अंगावर पाठीवर पायावर मारहाणी वन मोठ्या प्रमाणावर आहेत.रीता प्रभाकर भोसले यांनी आपल्यावर बेदम मारहाण, अंगावरील ब्लाउज देखील फाडण्यात आला, विनयभंग, रोख रक्कम व सोन्याचे दागिने हिसकावून घेणे, तसेच जिवे मारण्याचा आणि बलात्काराचा प्रयत्न झाल्याचा गंभीर आरोप केला त्या लोकांची नावे






सदाशिव रतन काळे,नितीन सदाशिव काळे,गोरख सुरेश भोसले,गोरख सदाशिव काळे,बालाजी सखाराम काळे,संतोष सखाराम काळे,रोहित कालिदास भोसले,कालिदास रामदास भोसले,पद्माबाई सुरेश भोसले,रेखाबाई सखाराम काळे,लक्ष्मीबाई गोरख काळे केला आहे. या घटनेनंतर त्या बीड जिल्हा रुग्णालयात उपचार घेत असून, त्यांचा हात फ्रॅक्चर झाला आहे आणि शरीरावर गंभीर मारहाणीच्या जखमा असल्याचे सांगण्यात आले.

पीडित महिलेने माध्यमांशी बोलताना सांगितले की, आरोपींनी त्यांना बेदम मारहाण करून अंगावरील कपडे फाडले, विनयभंग केला आणि सोबत असलेली रोख रक्कम व सोन्याचे दागिने काढून घेतले. तसेच जिवे मारण्याचा आणि बलात्कार करण्याचाही प्रयत्न करण्यात आला. जीव वाचवण्यासाठी उसाच्या शेतात पळ काढल्यामुळे आपण बचावल्याचा दावा त्यांनी केला.घटना सुरू असतानाच दोन स्कॉर्पिओ वाहने घटनास्थळी आल्याने आरोपींना पोलीस आल्याचा संशय निर्माण झाला आणि तेथून त्यांनी पळ काढल्याचेही महिलेने सांगितले. या प्रकरणात राजापूर गावच्या पोलीस पाटलांच्या वडिलांचाही सहभाग असल्याचा आरोप पीडितेने केला आहे.

## पाटोद्यात सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला समर्थन
## विविध मागण्यांसाठी उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

पाटोदा । प्रतिनिधी

देशातील वैज्ञानिक व शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला नैतिक समर्थन देत पाटोदा तालुक्यातील विविध चळवळीतील कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक यांनी सोमवार (दि. २० जुलै २०२६) रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर शांततामय निदर्शने केली. यावेळी उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत केंद्र सरकारला विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, नीट परीक्षेतील कथित गैरव्यवहार, परीक्षा प्रक्रियेतील अनियमितता आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित प्रश्नांवर केंद्र सरकारने तातडीने लक्ष द्यावे. सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाची दखल घेऊन त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. तसेच, नीट परीक्षेतील कथित गैरव्यवहाराची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणावी, विद्यार्थ्यांना न्याय




मिळावा आणि परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यासाठी केंद्र सरकारने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. आंदोलनकर्त्यांवर कोणत्याही प्रकारची दडपशाही करू नये, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय, राम मंदिर देणगी प्रकरणातील कथित गैरव्यवहाराची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली. यावेळी कॉम्रेड महादेव नागरगोजे, भाई विष्णूपंत घोलप,शिवभुषण जाधव,पद्माकर बिनवडे, राहुल जाधव,मुकुंद शिंदे, गणेश कवडे, दिलिप गाडे, सय्यद शफावोद्दीन, शेख इम्रान नुर, शेख इलियास,आबासाहेब भोसले, ॲड.विशाल मस्के,सुनिल काळे, पवन अडागळे, राजाभाऊ भोसले,नाईकवाडे मामा, शंकर घाडगे, पठाण युसुफ, सय्यद गणी, पाटोदा तालुक्यातील विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, विविध चळवळीतील कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

पान ६ वरुन...

### परळी वै मतदारसंघातील मतदार

यावेळी मतदार पुनरीक्षणाचे काम सर्वाधिक टक्केवारी पूर्ण केलेल्या इङ– यांचे प्रशासनासह धनंजय मुंडे यांनी अभिनंदन केले.

परळी तालुक्यातील ३३,६०० व अंबाजोगाई तालुक्यातील ५००० मतदारांच्या विशेष पुनरीक्षणाची जबाबदारी प्रशासनाने पार पाडावी, शासनाच्या वतीने नेमण्यात आलेल्या इङज यांच्या बाबतीत काही गावांमध्ये तक्रारी असल्याचे पदाधिकाऱ्यांनी निदर्शनास आणून दिले असता, प्रशासनाने संबंधित इङज यांच्या बाबतीत आलेल्या तक्रारींची तात्काळ दखल घेऊन त्यांना योग्य ताकीद द्यावी, अन्यथा कारवाई करावी, अशाही सक्त सूचना श्री. मुंडे यांनी दिल्या.

दरम्यान पुनरीक्षणाचे काम अंतिम टप्प्याकडे वाटचाल करत असताना ३१ जुलै रोजी पुन्हा सर्व इङ– व पदाधिकारी यांची संबंधित प्रशासकीय अधिकारी यांच्या समवेत पुन्हा बैठक घेऊन अंतिम आढावा घेणार असल्याचेही श्री. मुंडे पुढे बोलताना म्हणाले. यावेळी प्रशासनाच्या वतीने उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर व तहसीलदार विलास तरंगे यांनी गाव – प्रभागनिहाय आकडेवारी व अन्य माहिती सादर केली तसेच बूथ लेव्हल एजंट यांना येणाऱ्या अडचणी दूर करण्याबाबत माहिती दिली. या बैठकीस राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ड. राजेश्वर चव्हाण, परळीचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, अंबाजोगाईचे तालुकाध्यक्ष राजाभाऊ औताडे, युवक नेते अजय मुंडे, बाजीराव भैय्या धर्माधिकारी, प्रा. विनोद जगतकर यांसह पक्षाचे पदाधिकारी, विविध आघाडी – फ्रंटल सेलचे पदाधिकारी तसेच शहर व ग्रामीण मधील सर्व बूथ लेव्हल एजंट म्हणून कार्यरत सहकारी उपस्थित होते.

### आष्टीत मुख्यमंत्री महाआरोग्य

देण्यात येणार आहे.

बैठकीस उपजिल्हाधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक, महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी तसेच विविध विभागांचे प्रमुख अधिकारी व डॉक्टर मोठ्या संख्येने उपस्थित होते. जनतेला दर्जेदार आणि मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात येणारे हे मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिर आष्टी तालुक्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले.

### मुस्कान शेख व छाया पांचाळ

शल्यचिकित्सक डॉ. नागेश चव्हाण यांच्यामार्फत मुख्यमंत्री, पालकमंत्री सुनेत्रा पवार, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव आणि आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना निवेदन सादर करण्यात आले. आंदोलनात माहिती अधिकार कार्यकर्ते युनुस शेख, मुबीन शेख, शिवशर्मा शेलार, भिमराव कुटे,किष्किंधा पांचाळ बाळासाहेब मोरे माजी सैनिक अशोक येडे, सादेक सय्यद पठाण रफिक राजेंद्र आमटे डॉ.संजय तांदळे, बाजीराव ढाकणे, शेख आकरम, सत्तार रज्जाक,मोईन सरफोद्दीन, समाजसेवक सरफराज,शेख मुबारक,महेमुद मुबारक मुस्कान शेख यांचे पती सिद्दीक शेख, मामा मुन्ना शेख, चुलते जुबेर शेख,मोईन शेख,सत्तार शेख,रहिम शेख तसेच छाया पांचाळ यांचे पती गणेश पांचाळ,भाऊ आकाश कळसकर, कृष्णा दळवी,मसु पवार, गणेश घाडगे,बाळु कांबळे,सीता दहे,लहानाबाई कटकाळे, अमोल मुळे,शेख आक्रम आदी नातेवाईक सहभागी झाले होते.

### सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ

विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी सुरू असलेल्या सोनम वांगचुक यांच्या लढ्याला आपला संपूर्ण पाठिंबा असल्याचे स्पष्ट करत, विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी कोणत्याही परिस्थितीत तडजोड होऊ देणार नसल्याचा निर्धार व्यक्त केला.

या मोर्चात, ॲड. अजय बुरांडे, कॉ. बब्रुवान पोटभरे,अभिजीत लोमटे,प्रा. अरुंधती पाटील, सुदर्शन रापतवार, अमर देशमुख, भीमराव सरवदे, राजेश वाहुळे, धिमंत राष्ट्रपाल, अशोक पालखे, ॲड. माणिक आदमाने, ॲड. इस्माईल गवळी, रमीज सर, ॲड. शिवाजी कांबळे, रामकिसन मस्के, महेंद्र निकाळजे, अमन लोहिया, कालिदास आपेट, अच्युत गंगणे, दगडू लोमटे, गोरख शेंद्रे, राजकिशोर मोदी, पृथ्वीराज साठे, राजेसाहेब देशमुख, डॉ. नरेंद्र काळे, डॉ. राजेश इंगोले, बुध्दकरण जोगदंड, प्रशांत मस्के, सुहास चंदनशिव, सुनील जगताप, संजय साळवे , राजेंद्र घोडके, मस्के, मदनलाल परदेशी, अशोक हेडे, अशोक देवकर, रत्नदीप सरवदे, प्रा. अरुण गंगणे, प्रसन्नजित इंगळे, अरुण बनसोडे, ज्येष्ठ नागरिक ॲड. आनंद जगतकर, प्रा. दामोदर थोरात, संतराम कराड, प्रा. शांतिनाथ बनसोडे , चंद्रशेखर वडमारे,वसंतराव मोरे, चंद्रकला देशमुख, प्रा. सुकेशिनी नाईकवाडे, प्रा. नजीर शेख, विजय कोंबडे, सुहास चंदनशिव, समाज विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी, एस एफ आय चे कार्यकर्ते, यांच्यासह आदींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

## प्रा. मोतेकर लिखित बेसिक केमिस्ट्री पुस्तकाचे प्रकाशन

माजलगाव । प्रतिनिधी

सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाचे प्रा.श्रीनिवास चंद्रमोली मोतेकर लिखित 'बेसिक केमिस्ट्री-II' (Basic Chemistry-II) या शैक्षणिक पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

प्रा. श्रीनिवास चंद्रमोली मोतेकर यांचे ''बेसिक केमिस्ट्री–खख' (Basic Chemistry-II) हे पुस्तक बी.एस्सी. च्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार तयार करण्यात आले असून यामध्ये

रसायनशास्त्र विषयातील मूलभूत संकल्पना सोप्या व सुलभ पद्धतीने मांडण्यात आल्या



आहेत. स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील रसायनशास्त्र विषयातील विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमासाठी सदरील पुस्तक उपयुक्त ठरणार आहे. या पुस्तकात नवीन अभ्यासक्रमतानुसार प्रोटीन्स, व्हिटॅमिन्स आणि हार्मोन्सची रचना व महत्त्व, औषध निर्मितीचे नियम, फार्माकोलॉजी आणि विविध औषधांचे वर्गीकरण, सिड–बेस सिद्धांतासह सुपरसिड्स आणि सुपरबेसेसची सविस्तर माहितीचा समावेश करण्यात आला आहे.पुस्तक निर्मितीसाठी पुणे येथील शास्त्रज्ञ डॉ. सुधीर एस. अर्बुज यांचे विशेष सहकार्य लाभले. प्रकाशन सोहळ्या प्रसंगी प्र.प्राचार्य डॉ. एन. के. मुळे, माजी प्राचार्य डॉ. जी.के. सानप,उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे, उपप्राचार्य प्रा.प्रकाश गवते,उपप्राचार्य प्रा.पवनकुमार शिंदे, विभागप्रमुख डॉ शंकर इप्पर, डॉ. ओमप्रकाश सारगे, डॉ.सतीश डाके, डॉ. सुदर्शन स्वामी, डॉ.सुहास गवळी, डॉ.अर्चना कचरे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

## अनिषा ग्लोबल स्कूलमध्ये भव्य विद्यार्थी पदग्रहण समारंभ
## सीबीएसई इयत्ता दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

आष्टी । प्रतिनिधी

अनिषा ग्लोबल स्कूलमध्ये शैक्षणिक वर्षासाठी नव्याने निवड झालेल्या विद्यार्थी मंत्रिमंडळाचा पदग्रहण समारंभ मोठ्या उत्साहात व दिमाखात पार पडला. या कार्यक्रमास पिंपळेश्वर महादेव देवस्थानचे अध्यक्ष मा. श्री. सुरेश धस, शाळेच्या संचालिका सौ. प्राजक्ता धस, प्राचार्य श्री. अविनाश राऊत, प्राचार्या हरजोतकौर जोगी, तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर नव्याने निवड झालेल्या विद्यार्थी मंत्रिमंडळाने शिस्त, प्रामाणिकपणा, जबाबदारी आणि सेवाभाव जपत आपल्या कर्तव्याचे निष्ठेने पालन करण्याची शपथ घेतली. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थी प्रतिनिधींना बॅज व सॅश प्रदान करून त्यांना पदाची अधिकृत जबाबदारी सोपविण्यात आली.

यावेळी मार्गदर्शन करताना अध्यक्ष मा. श्री. सुरेश धस यांनी विद्यार्थी नेत्यांचे




अभिनंदन करून प्रामाणिकपणे, आत्मविश्वासाने व समर्पित भावनेने नेतृत्व करण्याचे आवाहन केले. शाळेच्या संचालिका सौ. प्राजक्ता धस यांनी नेतृत्वगुण, सांघिक भावना आणि चारित्र्यनिर्मितीचे महत्त्व अधोरेखित केले. प्राचार्य श्री. अविनाश राऊत आणि प्राचार्या हरजोतकौर जोगी यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक उत्कृष्टतेबरोबरच नेतृत्वगुण, नैतिक मूल्ये आणि सामाजिक जबाबदारी जोपासण्याचा संदेश दिला. या विशेष प्रसंगी शाळेतील उइडए इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षेत प्रथम ते पाचवा क्रमांक मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्रे व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रम, चिकाटी आणि उत्कृष्ट यशाबद्दल शाळा व्यवस्थापनाने त्यांचे कौतुक केले तसेच त्यांच्या पालक व शिक्षकांचेही मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या मोलाच्या योगदानाची दखल घेतली. यावेळी उइडए इयत्ता दहावीच्या बोर्ड परिक्षेत निरव गांधी याने १०० पैकी शंभर मार्क मिळवलेल्या कॉम्प्युटर प्लिकेशन या विषयाचे शिक्षक श्री. अक्षय गागरे यांचा यावेळी स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. शेवटी आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली. नेतृत्व, गुणवत्ता, शिस्त आणि उत्कृष्टतेची मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याच्या अनिषा ग्लोबल स्कूलच्या ध्येयाचा हा प्रेरणादायी सोहळा सर्वांच्या स्मरणात राहिला.

### जाहीर प्रगटन

आम जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल जाहिर प्रगटन देणार छाया भ्र. दिलीप माने, रा. ब्रहापूर, पो. म्हाळसजवळा, ता.जि. बीड, ह.मु.पुणे, ता.जि.पुणे.

मी व माझा पती दिलीप लिंबा माने, एक मुलगा सुरेश दिलीप माने व तीन विवाहीत मुली असे माझी कुटूंबीय आहे. विवाहीत मुली त्यांच्या सासरी सुखाने नांदत आहेत. माझे विवाहा नंतर मी सासरी नांदत असताना मुलींचे विवाहा नंतर मला व माझे मुलासह पत्ती व सासरे यांनी मला हाकलून दिल्याने मी नाविलाजास्तव पुणे येथे मोलमजूरी करून उपजिविका भागवित आहे. माझे सासरी माझे पती दिलीप लिंबा माने, दिर राजेभाऊ लिंबा माने व सासरे लिंबा वामन माने यांचे नावे वडिलोपार्जित एकत्र हिन्दू कुटूंबाची मौजे वाकनाथपूर, ता.जि. बीड येथे गट नं.१०८, १०९, ११० मध्ये अनुक्रमे ०–३८ आर, ०–४३ आर व ०–४३ आर शेत जमीन आहे. सदर मिळकती मध्ये माझा, माझा मुलगा व विवाहीत मुलींचा कायदेशिर हिस्सा आहे. सदर मिळकतीचे अद्याप पर्यंत माझे पती, दीर यांचेमध्ये सरस–निरस मानाने कुठल्याही प्रकारचे वाटप झालेले नाही. असे असताना आमचा हिस्सा डावलण्याचे हेतूने माझे पती व सासरचे लोक हे वरील गटातील काही जमीन विक्री करण्याचे किंवा अन्य प्रकारे हस्तांतरीत करण्याचे प्रयत्नात आहेत, असे खात्रीशिर समजले आहे.

तरी, वर नमूद जमीन मिळकतीतील जमीनी बाबत कोणीही कसल्याही प्रकारचा खरेदी–विक्रीचा, बँक कर्ज, खाजगी कर्ज, ईसारपावती, दान, गहाण, तारण, बक्षीस, विक्री, भाडेपत्र, मुखत्यारपत्र या मार्गाने व इतर अन्य कुठल्याही मार्गान लेखी किंवा तोंडी खरेदी बाबत इस्तांतरणाचा व्यवहार करू नये किंवा सदर मिळकतीत कसलेही हक्क निर्माण करू नयेत. तसे झाल्यास सदर व्यवहार माहीवर व माझा मुलगा, मुली यांचेवर कायदेशीर बंधनकारक राहणार नाही व त्यानंतर होणाऱ्या कायदेशिर कार्यवाहीस व्यवहार करणार हे जबाबदार राहतील. करीता है जाहीर प्रगटन देण्यात येते.

बीड
दिनांक: २०/०७/२०२६
मार्फत :–
ॲड. आर. आर. शिंदे,
बीड. मोबा. ९४२२७०२८४३

जाहीर प्रगटन देणार
छाया भ्र. दिलीप माने,
रा. ब्रह्मपूर, पो. म्हाळसजवळा,
ता. जि. बीड

## नागरी व मल्टीस्टेट पतसंस्थांच्या सुरक्षिततेसाठी कायद्यात सुधारणा करणार : मुख्यमंत्री फडणवीस

माजलगाव । प्रतिनिधी

राज्यातील नागरी सहकारी आणि मल्टीस्टेट सहकारी पतसंस्थांचे कामकाज अधिक पारदर्शक, सक्षम व सुरक्षित करण्यासाठी आवश्यक त्या कायदेशीर सुधारणा करण्यात येतील, अशी महत्त्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. महाराष्ट्रातील नागरी सहकारी व मल्टीस्टेट सहकारी पतसंस्थांच्या शिष्टमंडळाने मुंबई येथे मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली.

अहिल्यानगरचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील व मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या भेटीत महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था



फेडरेशनचे कार्याध्यक्ष ओमप्रकाश दादाप्पा (काका) कोयटे, राज्य मल्टीस्टेट फेडरेशनचे अध्यक्ष सुरेश वाबळे,मल्टीस्टेट फेडरेशनचे संचालक ड.रविंद्र कानडे, शिवाजीराव कपाळे,कडूभाऊ काळे,जितेंद्र जैन, एस.एस.गडगे आदी उपस्थित होते.बैठकीत पतसंस्थांसमोरील अडचणी, विद्यमान कायद्यांतील त्रुटी, ठेवीदार व सभासदांच्या हिताचे संरक्षण, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि पारदर्शकता वाढविण्यासाठी उपाययोजनांवर चर्चा झाली. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्य शासन सहकार क्षेत्र अधिक मजबूत करण्यासाठी कटिबद्ध आवश्यक असल्याचे सांगत आवश्यक कायदे बदल करण्याचे आश्वासन दिले.या संपूर्ण प्रक्रियामध्ये मराठवाड्याच्या वतीने माजलगाव येथील नावलौकिक असलेली श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचे कार्यकारी संचालक ॲड.रवींद्र कानडे यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.दरम्यान, दिल्ली येथे केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनाही मल्टीस्टेट पतसंस्थांच्या विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.या बैठकीस सुरेश वाबळे,आ. प्रवीण दरेकर, संजय भेंडे,काका कोयटे,कडूभाऊ काळे, शिवाजीराव कपाळे,जितेंद्र जैन,रवींद्र कानडे, सुकुमार पाटील, एस.एस.गडगे, एम.एल.चौगुले व शिवाजीराव ढोले आदी उपस्थित होते.केंद्रीय सहकार आमित शहा यांच्यासमवेत स्वतंत्र बैठक घेऊन पुढील कार्यवाही केली जाईल,अशी माहिती त्यांनी दिली.मुख्यमंत्र्यांच्या घोषणेमुळे राज्यातील नागरी व मल्टीस्टेट सहकारी पतसंस्था क्षेत्रात सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून, अधिक सुरक्षित, व्यवस्थेकडे वाटचाल होईल, सक्षम व पारदर्शक सहकार असा विश्वास शिष्टमंडळाने व्यक्त केला.

cmyk

# राज्यात रासायनिक कीटकनाशकांचा ८,२६६ मेट्रिक टन वापर

## जैविक कीटकनाशकांचा वापर मर्यादीतच, कृषी विभागाची आकडेवारी

पुणे / प्रतिनिधी

राज्यात शेतीतील कीड व रोगांच्या नियंत्रणासाठी रासायनिक कीटकनाशकांवर शेतकऱ्यांचे अवलंबित्व अद्याप कायम असल्याचे कृषी विभागाच्या मागणी व प्रत्यक्ष वापराच्या आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. राज्यात खरीप व रब्बी हंगाम मिळून रासायनिक कीटकनाशकांची ९,८८४ मेट्रिक टन मागणी नोंदविण्यात आली होती. त्यापैकी ८,२६६ मेट्रिक टनांचा वापर झाला असून, एकूण मागणीच्या सुमारे ८४ टक्के कीटकनाशके शेतकऱ्यांनी वापरली आहेत. रासायनिक कीटकनाशकांमध्ये देशांतर्गत उत्पादित, आयातीत तसेच संयुक्त गटातील उत्पादनांचा समावेश आहे. कीड व रोगांचा प्रादुर्भाव, पिकांचे क्षेत्र, हवामानातील बदल आणि पावसाचे प्रमाण यानुसार या कीटकनाशकांचा वापर झाला. समन्वित कीड व्यवस्थापन, कीड नियंत्रणासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि हवामानातील बदलांमुळे रासायनिक कीटकनाशकांच्या वापरात काही प्रमाणात संयम दिसून येत आहे. दुसरीकडे, जैविक कीटकनाशकांचा वापर वाढत असला तरी तो तुलनेने अद्यापही मर्यादित असल्याचे या




अहवालातून स्पष्ट होते.अझाडिरॅक्टीन, बॅसिलस, ट्रायकोडर्मा, स्यूडोमोनास, ब्यूव्हेरिया, व्हर्टिसिलियम, मेटारायझियम आणि एनपीव्ही यांसारख्या जैविक उत्पादनांचा वापर शेतकरी अधिक प्रमाणात करू लागले आहेत. विशेष म्हणजे, काही जैविक घटकांचा प्रत्यक्ष वापर मागणीपेक्षाही अधिक नोंदविण्यात आला आहे. त्यामुळे रासायनिक कीटकनाशकांबरोबरच पर्यावरणपूरक उपायांचा स्वीकार वाढत असल्याचे संकेत मिळत आहेत. जैविक कीटकनाशकांमध्ये एकूण ९८.९३ मेट्रिक टन मागणी असताना १२०.४९ मेट्रिक टनांचा वापर झाला. विशेष म्हणजे, बॅसिलस (८९.५४ मेट्रिक टन) आणि अझाडिरॅक्टीन (२१.४० मेट्रिक टन) या जैविक घटकांचा सर्वाधिक वापर झाला आहे. मागणीपेक्षाही अधिक वापर नोंदविल्याने जैविक कीड नियंत्रण पद्धतींचा स्वीकार वाढत असल्याचे या आकडेवारीतून स्पष्ट होते. असे असले तरी रासायनिक कीटनाशकांच्या तुलनेत जैविक कीड नियंत्रणाचा वापर अद्यापही मर्यादितच आहे.

रासायनीक फवारणी गरजेनुसार करा :

कृषी विभागाने शेतकऱ्यांना गरजेनुसारच रासायनिक कीटकनाशकांची फवारणी करण्याबरोबरच जैविक कीटकनाशके आणि समन्वित कीड व्यवस्थापनाचा अवलंब करण्याचे आवाहन केले आहे. त्यामुळे उत्पादन खर्चात बचत, मातीचे आरोग्य सुधारणा, अवशेषमुक्त अन्नधान्य निर्मिती आणि पर्यावरण संवर्धनाला चालना मिळणार असल्याचे तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.

## कमी कालावधीत येणारे मूग पिकाचे दर्जेदार सुधारित वाण

कमी पाऊस, वाढता उत्पादन खर्च आणि खतटंचाईची शक्यता लक्षात घेता शेतकऱ्यांनी मूग पिकाकडे वळणे फायदेशीर राहू शकते. मुगाच्या लागवडीसाठी सुधारित वाणांची निवड केल्यास उत्पादनाचा धोका कमी करण्यासाठी मदत होऊ शकते. राहुरीच्या कडधान्य सुधार प्रकल्पातील तज्ज्ञांनी मुगाचे सुधारित वाण शिफारस केले आहे.



फुले सुवर्ण : महात्मा फुले कृषी विद्यापीठाने २०२४ मध्ये प्रसारित केलेला फुले सुवर्ण हा वाण ६२ ते ७४ दिवसांत पक्व होतो. हा वाण उशिरा पेरणीसाठी योग्य असून भुरी आणि पिवळा विषाणू रोगास मध्यम प्रतिकारक्षम आहे. या वाणापासून हेक्टरी १० ते १२ क्विंटल उत्पादन मिळू शकते. हा वाण पश्चिम महाराष्ट्रासाठी शिफारस करण्यात आला आहे.

फुले चेतक : २०२१ मध्ये प्रसारित झालेला फुले चेतक हा वाण ६५ ते ७० दिवसांत तयार होतो. याचे दाणे टपोरे हिरवे असून शेंगा लांब असतात. हा वाण भुरी रोगास प्रतिकारक्षम असून १२ ते १५ क्विंटल प्रति हेक्टर उत्पादन देण्याची क्षमता आहे. हा वाण संपूर्ण महाराष्ट्रासाठी शिफारस करण्यात आला आहे.

उत्कर्ष (केएम-११-५८४) : हा वाण ६५ ते ७० दिवसांत पक्व होतो. टपोरे दाणे आणि लांब शेंगा ही याची वैशिष्ट्ये आहेत. भुरी रोगास मध्यम प्रतिकारक्षम असलेल्या या वाणापासून १२ ते १५ क्विंटल उत्पादन मिळू शकते.

बीएम-२००३-२ : २०१२ मध्ये प्रसारित झालेला हा वाण ६५ ते ७० दिवसांत तयार होतो. टपोरे दाणे, लांब शेंगा आणि भुरी रोगावरील प्रतिकारक्षमता ही त्याची वैशिष्ट्ये आहेत. या वाणाची उत्पादन क्षमता १२ ते १४ क्विंटल प्रति हेक्टर आहे.

पीकेव्ही एकेएम-४ : हा वाण ६५ ते ७० दिवसांत पक्व होतो. मध्यम आकाराचे दाणे आणि एकाच वेळी पक्वता येणे हे त्याचे वैशिष्ट्य आहे. या वाणापासून १२ ते १५ क्विंटल उत्पादन मिळू शकते. पीकेव्ही ग्रीन गोल्ड : विदर्भासाठी शिफारस केलेला पीकेव्ही ग्रीन गोल्ड हा वाण ७० ते ७५ दिवसांत तयार होतो. भुरी रोगास प्रतिकारक्षम असलेल्या या वाणापासून १० ते ११ क्विंटल उत्पादन मिळते. तसेच हा वाण एकाच वेळी पक्व होतो.

## गाय-म्हशीला भिजलेला चारा खाऊ घातल्यास दुध उत्पादनात होऊ शकते

देशात दूध व्यवसायातून शेतकऱ्यांनी मोठी क्रांती घडवून आणली आहे. महाराष्ट्रातही मोठ्या प्रमाणात शेतकरी म्हशी - गायी यांच्या माध्यमातून पशुपालन व्यवसाय करतात. मात्र शेतकऱ्यांना पशुपालन व्यवसाय करताना गाय किंवा म्हशीच्या आहारावर विशेष लक्ष देण्याची गरज असते. अनेक शेतकरी हे घाईघाईमध्ये जनावरांना ओला चारा अर्थात भिजलेला किंवा पाण्याने कुजलेला टाकून देतात. मात्र, अशा भिजलेल्या चाऱ्यामुळे गायीच्या किंवा म्हशीच्या दुध उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता असते. ज्यामुळे पशुपालकांना मोठा आर्थिक फटका सहन करावा लागू शकतो.

पावसाळ्याच्या दिवसांमध्ये अनेक भागांमध्ये शेतकरी जनावरांच्या चाऱ्याची विशेष काळजी घेत नाही. मग असा चारा काढणीच्या वेळी शेतात भिजला असेल, आणि त्यानंतर तो शेतकऱ्यांनी उन्हाळ्यासाठी साठवून ठेवला असेल त्यावर बुरशी चढते. मग असा काही प्रमाणात कुजलेला चारा उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये वापरला जातो. मात्र हा भिजलेला चारा जनावरांना खाऊ घालणे घातक असून, त्यातून जनावरांना लेमनाईटिश हा आजार देखील जडू शकतो. यालाच टंगफुल्ली आजार असे देखील म्हटले जाते. त्यामुळे तुम्ही तुमच्या जनावराला भिजलेला चारा खाऊ घातल्यास दुधाळ जनावर चारा खाणे कमी करते. ज्यामुळे त्याचा थेट दूध निर्मितीवर परिणाम होऊन दुधात घट होते. परिणामी दूध उत्पादकांना मोठा आर्थिक फटका बसतो. याशिवाय अशा चाऱ्यामुळे जनावरांस लेमनाईटिशची लागण देखील होऊ शकते.लेमनाईटिशबाबत जनजागृती आवश्यक : पशुचिकित्सकांच्या म्हणण्यानुसार, लेमनाईटिश आजाराने ग्रासलेल्या जनावरांना वेळीच डॉक्टरांना दाखवले नाही तर असे जनावर जखमी देखील होऊ शकते. हा आजार प्रामुख्याने भिजलेला चारा खाल्ल्याने होतो. अनेकदा उन्हाळयात चाऱ्याची कमतरता असल्याने शेतकरी जनावरांना भिजलेला चाराही टाकून देतात. ज्यामुळे जनावरांच्या आरोग्यावर परिणाम तर होतो. शिवाय दूध उत्पादनात घट देखील होते. अशा वेळी जनावर अंगावर आजार काढत असते. पशुचिकित्सकांच्या म्हणण्यानुसार, अनेक शेतकऱ्यांना या आजाराबद्दल माहिती नसते. ज्यामुळे या आजाराबाबत जनजागृती होणे आवश्यक आहे.लेमनाईटिशपासून बचाव : पशुचिकित्सकांच्या म्हणण्यानुसार, या आजारापासून जनावरांना बरे करण्यासाठी लसीकरण केले जाते. याशिवाय शेतकऱ्यांनी आपल्या जनावराला हा आजार होऊ नये. यासाठी तीन महिन्यातून एकदा जंतनाशक गोळ्या देणे देखील आवश्यक आहे. ज्यामुळे या आजारापासून जनावरास ९० टक्क्यांपर्यंत संरक्षण मिळते. यानंतर एखादे दुधाळ जनावर भिजलेला चारा खाल्ल्याने आजारी दिसून येत असेल तर त्याला पशुवैद्यकीय दवाखान्यात तपासून घ्यावे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या जनावरांच्या आहारावर विशेष लक्ष देण्याची गरज असून, शक्य असल्यास दुधाळ जनावरास रोज २५० ग्रॅम गहू पीठ खाऊ घालावे. ज्यामुळे दूध उत्पादनात वाढ होण्यास मदत होते.

## झाडावरील केळीचे घड पिशवीने झाकण्यामुळे होतात आश्चर्यकारक फायदे!

केळी उत्पादक शेतकरी केळीचे घड पिशव्यांनी झाकतात. ही एक सामान्य कृषी पद्धत आहे ज्यामुळे फळांचे विविध पर्यावरणीय घटक, कीटक आणि रोगांपासून संरक्षण होते. सामान्यत: या पिशव्या पॉलिथिन, न विणलेले फॅब्रिक किंवा कागदासारख्या सामग्रीपासून बनविलेले असतात. केळीचे घड पिशव्यांमध्ये पॅक केल्याने अनेक फायदे मिळतात. आधुनिक केळी शेतीमध्ये ही एक आवश्यक क्रिया आहे. केळीचे घड पिशवीने झाकण्याचे अनेक फायदे आहेत

कीटक आणि रोगांपासून संरक्षण : केळीचे घड पिशवीत ठेवण्याचे मुख्य फायदे म्हणजे ते विविध कीटक आणि रोगांपासून संरक्षण प्रदान करते. फुलकिडी, फळमाशी आणि इतर कीटक यांसारख्या कीटकांमुळे केळीच्या फळांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते, ज्यामुळे चट्टे, डाग आणि इतर गुणवत्तेच्या समस्या निर्माण होतात. तसेच या किडी आणि रोगांना पिशव्या अडथळा म्हणून काम करतात, ज्यामुळे या कीटकांना फळांपर्यंत पोहोचण्यापासून प्रतिबंध होतो. आर्द्र वातावरणात जेथे करपा आणि सिगार रॉट सारख्या बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव होतो. बॅगिंगमुळे एक सूक्ष्म वातावरण तयार होते जे फळांच्या पृष्ठभागाशी ओलावा कमी करते, ज्यामुळे अशा रोगांचे प्रमाण कमी होते. यामुळे रासायनिक कीटकनाशकांची गरज कमी होते, त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण होते. सुरक्षित, कीटकनाशकमुक्त फळ उत्पादित होते. याव्यतिरिक्त, पावसाळ्यात फळांना पिशव्या मातीच्या कणांपासून दूषित होण्यास प्रतिबंध होते.



फळांची चांगली गुणवत्ता : केळीची गुणवत्ता वाढवण्यात बॅगिंग महत्त्वाची भूमिका बजावते. पिशव्या धूळ, घाण आणि यांत्रिक नुकसान यासारख्या बाह्य घटकांपासून फळांचे संरक्षण करतात. परिणामस्वरुप, केळी गुळगुळीत त्वचेसह एकसमान आकार विकसित करतात, त्यावर कोणतीही खूण किंवा डाग नसतात. निर्यातक्षम केळीसाठी हे अतिशय महत्त्वाचे आहे. केळीची गुणवत्ता हा बाजारभावाचा एक महत्त्वाचा निर्धारक आहे. याव्यतिरिक्त, पिशव्या सूर्य प्रकाशामुळे होणारी सन बर्निंग कमी करण्यास मदत करते, थेट सूर्यप्रकाशापासून फळांचे संरक्षण करून, बॅगिंग केळीचा नैसर्गिक रंग टिकवून ठेवते, ज्यामुळे ग्राहक आकर्षित होतात. त्यामुळे शेतकऱ्यांना बाजारात जास्त भाव आणि अधिक नफा मिळतो.

फळांची चांगली वाढ आणि परिपक्वता : केळीचे घड पिशव्यांमध्ये पॅक केल्याने फळांच्या सभोवतालच्या सूक्ष्म वातावरणावर सकारात्मक परिणाम होतो, ज्यामुळे फळांची वाढ, आकार आणि परिपक्वता चांगली राहते. पिशव्या फळांच्या सभोवतालच्या ओलाव्याची योग्य पातळी राखण्यास मदत करतात, जे फळ भरण्यासाठी आणि विकासासाठी आवश्यक आहे. हे नियंत्रित वातावरण फळांचे वजन आणि आकार सुधारू शकते, ज्यामुळे प्रति घड जास्त उत्पादन मिळते. शिवाय, बॅगिंगमुळे केळी मजबूत होतात आणि त्यांचे शेल्फ लाइफ वाढते, जे स्थानिक बाजारपेठ आणि निर्यात दोन्हीसाठी फायदेशीर आहे.

काढणी नंतरचे नुकसान कमी करणे : काढणीनंतर, विशेषतः हाताळणी, वाहतूक आणि साठवण दरम्यान केळीचे लक्षणीय नुकसान होते. कापणीपूर्व अवस्थेत बॅगिंगमुळे संरक्षणाचा अतिरिक्त थर देऊन हे नुकसान कमी करण्यात मदत होते. फळांचा दर्जा चांगला आणि नुकसानीचा प्रादुर्भाव कमी होतो. म्हणजे पॅकिंग अवस्थेत आणि वाहतुकीदरम्यान कमी फळे खराब होतात. याव्यतिरिक्त, बॅगिंगमुळे पिशव्या फळांमध्ये ओलावा टिकवून ठेवण्यास मदत करतात. त्यामुळे फळांचे वजन कमी होत नाही. उच्च तापमान असलेल्या भागात किंवा कोरड्या हंगामात जेव्हा निर्जलीकरणाचा धोका जास्त असतो तेव्हा हे विशेषतः महत्त्वाचे आहे.

पर्यावरणास अनुकूल : कीटकनाशकांच्या अति वापरासाठी बॅगिंग हा पर्यावरण पूरक पर्याय आहे. रासायनिक हस्तक्षेपाची गरज कमी करून, ही पद्धत केळीच्या टिकाऊ उत्पादनात योगदान देते. हे सेंद्रिय आणि कीटकनाशक-मुक्त उत्पादनासाठी देते. बायोडिग्रेडेबल किंवा पुन्हा वापरता येण्याजोग्या पिशव्या वापरल्याने टिकाऊपणा आणखी वाढते, ज्यामुळे पर्यावरणीय प्रभाव कमी होतो.

खर्चात बचत : पिशव्यांमधील सुरुवातीची गुंतवणूक अतिरिक्त खर्चासारखी वाटत असली तरी कीटकनाशके, फळांचा दर्जा आणि उच्च बाजारभाव या दृष्टीने दीर्घकालीन फायदे बॅगिंगला किफायतशीर पर्याय बनवतात. उत्पादनात वाढ आणि काढणी नंतरच्या नुकसानीतील घट यामुळे बॅगिंगची गुंतवणूक अधिक योग्य वाटते.

हवामानास अनुकूल : अतिवृष्टी किंवा जोरदार वारा यांसारख्या परिस्थितीत, बॅगिंगमुळे फळांच्या घडांना अतिरिक्त संरक्षण मिळते. पिशव्या गारपीट, मुसळधार पाऊस आणि काही बाबतीत पानांमुळे होणारे नुकसान कमी करण्यास मदत करतात. यामुळे हवामानातील बदलांशी जुळवून घेण्यासाठी आणि बदलत्या हवामानाच्या पद्धती असूनही सातत्यपूर्ण उत्पादन सुनिश्चित करण्यासाठी बॅगिंग हा एक मौल्यवान उपाय आहे.




### महत्वाच्या घटना

१८३७ : व्हिक्टोरिया इंग्लंडच्या राणीपदी
१८४० : सॅम्युअल मोर्स यांना टेलिग्राफ चा पेटंट मिळाला.
१८६३ : वेस्ट व्हर्जिनिया अमेरिकेचे ३५ वे राज्य बनले.
१८७७ : अलेक्झांडर ग्रॅहॅम बेल यांनी कॅनडा मध्ये जगातील पहिल्या व्यावसायिक दूरध्वनी सेवेची सुरवात केली.
१८८७ : देशातील सर्वाधिक गर्दीचे स्टेशन व्हिक्टोरिया टर्मिनस (सध्याचे नाव सी. एस. टी.) सुरू झाले.
१८९९ : केंब्रिज विद्यापीठाच्या 'ट्रायपॉस' या गणिताच्या अंतिम परीक्षेत रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे पहिल्या वर्गात पहिले आल्यामुळे त्यांना सिनिअर रँग्लर होण्याचा बहुमान मिळाला.
१९२१ : टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना
१९६० : महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची स्थापना
१९९० : ७.४ मेगावॅटचा भूकंपात इराण मध्ये ५०,००० लोक ठार तर १,५०,००० पर्यंत जखमी झाले.
१९९७ : 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी'तर्फे राज्यातील पहिली मुलींची सैनिकी शाळा पुण्याजवळ सुरू झाली.
२००१ : परवेझ मुशर्रफ पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष झाले.
२०१४ : प्रसिद्ध कवी केदारनाथ सिंह यांना ज्ञानपीठ पुरस्कार घोषित करण्यात आला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५६ : प्रसिद्ध ब्रिटीश व्यापारी व राजकारणी सर एडवर्ड अल्बर्ट ससून यांचा जन्मदिन.
१८६९ : लक्ष्मणराव किर्लोस्कर किर्लोस्कर उद्योगसमुहाचे संस्थापक (मृत्यू: २६ सप्टेंबर १९५६)
१८७६ : भारतीय तेलगु भाषिक चित्रपट क्षेत्राच्या इतिहासातील प्रसिद्ध पहिले गीतकार चांदला केसावदासू यांचा जन्मदिन.
१९१५ : टेरेन्स यंग चिनी-इंग्लिश दिग्दर्शक आणि पटकथाकार (मृत्यू: ७ सप्टेंबर १९९४)
१९२० : मनमोहन अधिकारी लोकशाही पद्धतीने निवडण्यात आलेले नेपाळचे पहिले पंतप्रधान, कम्युनिस्ट नेते (मृत्यू: २६ एप्रिल १९९९)
१९३९ : रमाकांत देसाई जलदगती गोलंदाज व राष्ट्रीय निवड समितीचे अध्यक्ष (मृत्यू: २८ एप्रिल १९९८)
१९४८ : नौरूचे राष्ट्राध्यक्ष लुडविग स्कॉटी यांचा जन्म.
१९५२ : भारतीय लेखक आणि कवी विक्रम सेठ यांचा जन्म.
१९५४ : ॲलन लॅम्ब इंग्लिश क्रिकेटपटू
१९७२ : पारस म्हांब्रे क्रिकेटपटू
१९७६ : प्रसिद्ध भारतीय महिला कसोटी व एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू देविका पळशीकर यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६६८ : हेन्रिच रॉथ जर्मनीतील संस्कृत विद्वान आणि धर्मप्रसारक (जन्म: १८ डिसेंबर १६२०)
१८३७ : विल्यम (चौथा) इंग्लंडचा राजा (जन्म: २१ ऑगस्ट १७६५)
१९१७ : अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ जेम्समेसन क्राफ्ट्स यांचे निधन.
१९३० : ब्रिटीश कालीन रामपूर रियासतचे नवाब हमीद अली खान बहादूर यांचे निधन.
१९७२ : साली प्रसिद्ध भारतीय भौतिकशास्त्रज्ञ प्रा. कोट्टरलाकोटा रंगधामा राव यांचे निधन.
१९८७ : जागतिक कीर्तीचे पक्षीतज्ञ, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे एक संस्थापक पद्मभूषण डॉ. सलीम अली यांचे निधन. (जन्म: १२ नोव्हेंबर १८९६)
१९९७ : बासू भट्टाचार्य चित्रफट दिग्दर्शनाच्या पदार्पणातच राष्ट्रपती पुरस्कार मिळवणारे निर्माते व दिग्दर्शक (जन्म: १९३४)
१९९७ : वासुदेव वामन तथा 'भाऊसाहेब' पाटणकर ऊर्फ 'जिंदादिल' मराठीतले पहिले शायर (जन्म: ? ? १९०८)
२००७ : सुप्रसिद्ध भारतीय बंगाली चित्रपट अभिनेत्री अनिता गुहा यांचे निधन.
२००८ : चंद्रकांत गोखले अभिनेते (जन्म: ७ जानेवारी १९२१)
२००९ : पाकिस्तान देशाचे कीटकशास्त्रज्ञ, प्राध्यापक, अभिनेते आणि उद्योजक दतुक रहमान अन्वर सय्यद यांचे निधन.
२०१० : माजी भारतीय कसोटी क्रिकेटपटू गुंडीबाईल रामा सुंदराम यांचे निधन.
२०१३ : भारतीय पत्रकार डिकी रुतनागुर यांचे निधन. (जन्म: २६ फेब्रुवारी १९३१)
१९८७ : जागतिक कीर्तीचे पक्षीतज्ञ, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे एक संस्थापक डॉ. सलीम अली यांचे निधन. (जन्म: १२ नोव्हेंबर १८९६)

## भावात वाढ झाल्याने हळद आवक वाढली

### विक्रीसाठी २६ जुलैनंतरच येण्याचे हिंगोली बाजार समितीचे आवाहन

हिंगोली / प्रतिनिधी

मराठवाड्यासह विदर्भात हळद खरेदी- विक्रीसाठी सर्वदूर प्रसिद्ध असलेल्या हिंगोली कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मार्केट यार्डात आठवडाभरापासून भाव वधारल्यामुळे हळदीची आवक वाढली आहे. सद्यःस्थितीत हळद विक्रीसाठी घेऊन आलेली शेकडो वाहने रांगेत उभी आहेत. त्यामुळे बीट आणि मोजमापासाठी किमान आठवड्याचा कालावधी लागणार आहे. हिंगोली येथील मार्केट यार्डात हळदीच्या दरात आठवडाभरापासून किंचित वाढ झाली. वास्तविक पाहता आंतरराष्ट्रीय बाजारात हळदीची मागणी लक्षात घेता सध्या हळदीला किमान १८ ते २० हजार रुपये भाव मिळणे अपेक्षित आहे. मात्र, मार्केट यार्डात सध्या १६,५०० ते १७,५०० रुपयांदरम्याने भाव मिळत आहे. परंतु, मे आणि जूनच्या तुलनेत भाव वधारल्यामुळे ज्या शेतकऱ्यांकडे हळद शिल्लक आहे, ते विक्रीसाठी आणत आहेत. त्यामुळे मार्केट यार्डात गर्दी वाढली असून, सद्यस्थितीत जवळपास साडेतीनशेंवर वाहने रांगेत उभी आहेत.यातील काही वाहने बाजार समितीच्या आवारात तर काही वाहनांची बाहेर रस्त्यावर रांग लागत आहे. बाजार समितीच्या आवारात जागा अपुरी पडत असल्याने अनेक वाहने बाहेर रस्त्यावर लांबच लांब रांगेत उभी आहेत. या वाहनांतील हळदीचे बीट आणि वजनकाटा करण्यासाठी किमान आठवडाभराचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे उर्वरित शेतकऱ्यांनी दि. २६ जुलैनंतर हळद विक्रीसाठी आणावी, असे आवाहन बाजार समिती प्रशासनाने केले आहे.



राज्य लोकतंत्र
# मराठवाडा वृत्तांत
मंगळवार दि.२१ जुलै २०२६ ५



# डिलिमिटेशन विधेयक लोकसभेत बहुमताने मंजूर होणार!

## संजय शिरसाट म्हणाले- शरद पवारांचा आदेश राष्ट्रवादी मान्य करेल

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

डिलिमिटेशन (मतदारसंघ पुनर्रचना) विधेयकावरून विरोधकांमध्ये मतभेद सुरू असतानाच राज्याचे मंत्री संजय शिरसाट यांनी मोठा दावा केला आहे. हे विधेयक लोकसभेत बहुमताने मंजूर होईल आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार यांच्या भूमिकेनुसार निर्णय घेईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान झालेल्या कथित लाठीचार्जचे समर्थन करता येणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. छत्रपती संभाजीनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीनंतर पत्रकारांशी बोलताना शिरसाट यांनी विविध राजकीय मुद्द्यांवर भूमिका मांडली.



शिरसाट म्हणाले की, छत्रपती संभाजीनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक महायुतीने एकत्र लढवली असून शिवसेनेचे ९, भाजपचे ७ आणि राष्ट्रवादीचे २ संचालक निवडून आले आहेत. त्यामुळे अध्यक्षपदाचा नैसर्गिक हक्क शिवसेनेकडे आला आहे.त्यांनी सांगितले की, पहिली दोन वर्षे अध्यक्षपद शिवसेनेकडे, त्यानंतरची दोन वर्षे भाजपकडे आणि शेवटचे एक वर्ष राष्ट्रवादीकडे राहील. ''यामध्ये कुणी कुणावर कुरघोडी केलेली नाही. नैसर्गिक न्याय देण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे,'' असे ते म्हणाले.मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाबाबत बोलताना शिरसाट म्हणाले की, राष्ट्रवादीमध्ये वेगवेगळ्या भूमिका असल्या तरी अंतिम निर्णय शरद पवार यांच्या आदेशानुसारच होईल.''डिलिमिटेशनचे विधेयक सर्वांसाठी महत्त्वाचे आहे. राष्ट्रवादीच नव्हे तर ठाकरे गटालाही त्याचे महत्त्व समजले आहे. त्यामुळे हे विधेयक लोकसभेत बहुमताने मंजूर होईल, याबाबत कोणतीही शंका नाही,'' असे त्यांनी सांगितले.दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान झालेल्या कथित लाठीचार्जबाबत विचारले असता शिरसाट म्हणाले, आंदोलन शांततेच्या मार्गाने सुरू होते. सोनम वांगचुक यांच्या प्रकृतीबाबत उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार वैद्यकीय उपचार सुरू करण्यात आले आहेत. मात्र, लाठीचार्ज झाला असेल तर त्याचे समर्थन आम्हीही करणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.शिवसेना पदाधिकारी रमेश मात्रे यांच्यावर झालेल्या पोलिस कारवाईबाबत शिरसाट म्हणाले की, सत्तेत असतानाही स्वतःच्या नगरसेवकावर कारवाई होणे हे धैर्याचे लक्षण आहे.''आम्ही कुणालाही पाठीशी घालत नाही. पोलिसांनी कायदेशीर कारवाई केली आहे. त्यानंतर पक्षीय पातळीवर कोणती कारवाई करायची, याचा निर्णय एकनाथ शिंदे घेतील,'' असे त्यांनी सांगितले.एका वृत्तवाहिनीशी बोलताना संजय राऊत यांच्या सातत्याने होणाऱ्या टीकेवर शिरसाट यांनी पलटवार केला. ''रोज तेच बोलत राहणे, स्वतःवरच फोकस ठेवणे आणि पक्षाच्या धोरणांपेक्षा वैयक्तिक प्रसिद्धीला महत्त्व देणे, यामुळेच ठाकरे गटाची आजची परिस्थिती निर्माण झाली आहे,'' असा टोला त्यांनी लगावला. विरोधकांकडून ईडीच्या गैरवापराचे आरोप होत असल्याबाबत शिरसाट म्हणाले, ''आज ईडी कुठे दिसते? जे चुकीचे काम करतील त्यांच्यावर ईडीची कारवाई होईल. पण कोणत्याही तपास यंत्रणेने आमच्यावर कारवाई करू नये, अशी अपेक्षा ठेवणे योग्य नाही.''

सुप्रिया सुळे यांनी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांना वाकून नमस्कार केल्याच्या व्हिडिओवरून सुरू असलेल्या चर्चेबाबत शिरसाट म्हणाले, ''राजनाथ सिंह हे ज्येष्ठ नेते आहेत. महाराष्ट्राची संस्कृती म्हणजे ज्येष्ठांचा आदर करणे. आम्हीही शरद पवार यांच्या पाया पडतो. त्यामुळे सुप्रिया सुळे यांनी केलेल्या कृतीत काहीही गैर नाही. गिरीश महाजन यांचे कथित छेडछाड केलेले फोटो व्हायरल करणाऱ्या आरोपीला अटक झाल्याच्या पार्श्वभूमीवर शिरसाट म्हणाले, ''राजकीय नेत्यांचे बनावट फोटो आणि व्हिडिओ तयार करण्याचे प्रकार वाढत आहेत. अशा प्रकरणांमध्ये कठोर कारवाई झाली पाहिजे, जेणेकरून भविष्यात असे प्रकार घडणार नाहीत.''

## हिंगोलीत नीट पेपरफुटीचे तीव्र पडसाद

### केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या पुतळा दहनावरून राडा, शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते अन् पोलिसांत झटापट



हिंगोली। प्रतिनिधी

देशातील नीट पेपर फुटी प्रकरणात केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा गोरेगाव येथे सोमवारी ता. २० प्रतिकात्मक पुतळा दहन करणाऱ्या क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व पोलिसांत झटापट झाली. पोलिस पुतळा घेऊन पुढे तर कार्यरर्ते मागे असे चित्र पहावयास मिळाले. यावेळी कार्यकर्त्यांची घोषणाबाजी केली.नीट पेपर फुटी प्रकरणात केंद्रीयशिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजिनामा द्यावा तसेच देशभरातील विद्यार्थ्यांची माफी मागावी यासह इतर मागण्यांसाठी जिल्हाभरात आंदोलन सुरु झाली आहे. याशिवाय दिल्ली येथे सुरु असलेल्या सोनम वांगचुंक यांच्या आंदोलनाला जिल्हाभरातून पाठिंबा मिळत असून वसमत, कळमनुरी येथे प्रशासनाकडे निवेदन देण्यात आले आहे.

दरम्यान, सोमवारी ता. २० सकाळी क्रांतीकारी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी गोरेगाव येथे शिक्षण मंत्री प्रधान यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला जोडे मारो आंदोलन केले. यावेळी संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष गजानन कावरखे, जिल्हाध्यक्ष नामदेव पतंगे, प्रवीण मते, अशोक कावरखे, विठ्ठल वायचाळ, राहुल कावरखे, अमोल गिरे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी कार्यकर्त्यांनी केंद्राच्या विरोधात प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली.

सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक हे गेल्या २० दिवसांपासून अन्नत्याग आंदोलन करत आहेत. मात्र, इतक्या दिवसांनंतरही सरकारने आंदोलनाची दखल घेतली नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला. तसेच आंदोलन दडपण्याचा प्रयत्न होत असल्याचाही निषेध व्यक्त करण्यात आला. या शिवाय हिंगोलीचे भुमीपूत्र अभिजीत दिपके यांच्यावरही दडपण आणले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यावेळी कार्यकर्त्यांनी मंत्री प्रधान यांचा पुतळा दहन करण्याचा प्रयत्न केला. मात्र गोरेगाव पोलिसांच्या पथकाने प्रतिकात्मक पुतळा हिसकावून पळ काढला. यावेळी पोलिस व कार्यकर्त्यांमध्ये झटापट झाली. त्यानंतर प्रशासनाकडे निवेदन सादर करण्यात आले. यामध्ये केंद्रीयशिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा तात्काळ राजीनामा घ्यावा, नीट प्रकरणात आत्महत्या केलेल्या २० विद्यार्थ्यांच्या कुटुंबांना न्याय द्यावा तसेच त्यांच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरी द्यावी, अशी मागणी करण्यात आली

## 'ऑपरेशन टायगर' सुरूच राहणार; उबाठाचे नेते स्वत:हून संपर्क साधतात

### खासदारांच्या विलीनीकरणाचा निर्णय १००% कायदेशीर- योगेश कदम

धाराशिव। प्रतिनिधी

ऑपरेशन टायगर कालही थांबलं नव्हतं आजही थांबलं नाही उद्याही थांबणार नाही. आम्ही स्वत:हून कोणालाही संपर्क करत नाही. उबाठाचे कार्यकर्ते, नेते, लोकप्रतिनिधी आम्हाला संपर्क करतात आणि एकनाथ शिंदे यांच्यासोबत काम करायचे आहे असे सांगतात, शिवसेनेचे भवितव्य एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात दिसत आहे आम्हाला त्यांच्या नेतृत्वात काम करायचे आहे असे उबाठातील पदाधिकारी सांगत आहेत, असे मंत्री योगेश कदम यांनी म्हटले आहे.योगेश कदम म्हणाले की, संजय राऊत यांना माध्यमांसमोर शिव्या देण्याचे ज्ञान आहे कायद्याची समज नाही. ज्यावेळी एकनाथ शिंदे यांनी उठाव केला होता त्यावेळीसुद्धा त्यांनी अनेक घोषणा केल्या. उद्धव ठाकरेंनी जवळच्या चार लोकांवरच ठेवलेला विश्वास त्यांना भोवला आहे. खासदारांच्या विलीनीकरणाचा निर्णय कायदेशीर आहे. तर सुनील तटकरे यांनी रामदार कदम यांच्यावर केलेल्या टीकेनंतर आता कुठेही कॉम्प्रमाईजसाठी जागा राहिली नाही. आता हे मिटेल असं मला वाटत नाही. मागच्या विधानसभेला आणि लोकसभेला कोणी कोणाला मदत केली हे समोर आलं तर पितळ उघडे पडेल.

योगेश कदम म्हणाले की, मंत्रिमंडळ विस्तार कधी होणार याची आम्हाला काही कल्पना नाही. याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस निर्णय घेतील. पक्षांतर्गत जबाबदारी आणि ताकद एकनाथ शिंदे देतील ती आम्ही स्वीकारू. एफडीएच्या ज्या कारवाया होतात त्या अजून मोठ्या प्रमाणावर झाल्या पाहिजेत. आपण त्यासाठी केंद्र सरकारचा कायद्यानुसार काम करतो. यामध्ये बदल आपण केले पाहिजे असे आम्ही केंद्र सरकारला कळवले आहे. जो पर्यंत आपण कडक कायदा करत नाही तो पर्यंत या गुन्ह्यामध्ये जे लोकं सातत्याने सापडत आहेत त्यांना शिक्षा होणार नाही. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या संदर्भात संपूर्ण माहिती घेतली आहे. कोणतीही आस्थपणा चालवत असताना एफडीएचे नियम जर धाब्यावर बसवत असाल तर त्यांच्यावर कडक कारवाई झालीच पाहिजे. योगेश कदम म्हणाले की, नीट पेपरफुटीचे कोणीही समर्थन केले नाही. ज्या लोकांचा यामध्ये सहभाग होता त्या लोकांना शिक्षा झाली पाहिजे, ही आमची भूमिका आहे. ज्या व्यक्तीचा त्या प्रकरणाशी थेट संबंध नाही, मंत्री यात सहभागी असते तर त्यांचा राजीनामा मागणे योग्य होते. तरुणांचे जे नुकसान झाले ते पुन्हा होऊ नये यासाठी काम करणे गरजेचे आहे. वांगचुक हे चांगले समाजसेवक आहेत, त्यांनी सरकारला सूचना केल्या पाहिजेत की यामध्ये काय सुधारणा आणल्या जाव्यात. राजीनामा देणं म्हणजे काही सुधारणा नाही. पेपरफुटीला जबाबदार असणाऱ्या लोकांना आपण अटक केली आहे. वांगचुक यांनी आम्हाला पुढे असे काही घडणार नाही यासाठी सूचना कराव्या आपण एकत्र येत काम करू.

## भारनियमन रद्द करा म्हणत ठाकरे गटाचा रास्तारोको

हिंगोली। प्रतिनिधी

औंढा नागनाथ तालुक्यात रात्रीचे भारनियमन रद्द करावे यासह इतर मागण्यांसाठी ठाकरे गटाच्या वतीने औंढा नागनाथ ते जिंतूर मार्गावर रामेश्वर येथे सोमवारी ता. २० दोन तास रस्ता रोको आंदोलन केले. यामुळे वसमत, औंढा नागनाथ ते छत्रपती संभाजीनगर मार्गावरील वाहतूक दोन तास ठप्प झाली होती. त्यानंतर प्रशासनाकडे मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.औंढा नागनाथ तालुक्यातील रामेश्वर, साळणा आणि रुपर या ३३ केव्ही उपकेंद्रांतर्गत येणाऱ्या गावांमध्ये वीज पुरवठा सतत खंडित होत असल्यामुळे शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत. पेरणीनंतरच्या काळात पिकांना पाणी देणे गरजेचे असताना वीज नसल्यामुळे उभे पीक वाळून जाण्याची भिती व्यक्त केली जात आहे.

औंढा नागनाथ तालुक्यात रात्रीचे भारनियमन रद्द करावे, स्मार्ट मीटर बसवण्याचे काम तातडीने थांबवावे. रामेश्वर, साळणा, रुपर उपकेंद्रातील सर्व फिडरची दुरुस्तीची कामे त्वरित करावीत. उंडेगाव फिडरवरील कर्मचाऱ्याची तातडीने बदली करावी, वाऱ्यामुळे व पावसामुळे शेतात पडलेले पोल तसेच विजेचे तारांची दुरुस्ती करावी, सर्व स्वतंत्र गावठाण फिडर त्वरित चालू करावेत, नांदखेडा येथील तुटलेल्या विजेच्या तारा त्वरित चालू करून द्याव्यात या मागणीसाठी सोमवारी रामेश्वर येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.यावेळी ठाकरे गटाचे तालुका प्रमुख ज्ञानेश्वर उर्फ माऊली झटे, शेतकरी सेनेचे प्रदेश पदाधिकारी वसीम देशमुख, बबनराव इघारे, अशोक डव्हळे, माऊली मगर, भास्करराव इघारे, बाळासाहेब गारकर, तानाजी मोरे, बाळासाहेब देवकर, विक्रम मोरे, उत्तम मांडे, शेकुजी गारकर, गजानन मगर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. सकाळी आकरा वाजल्यापासून ते दुपारी एक वाजेपर्यंत आंदोलन करण्यात आले. त्यानंतर पोलिस प्रशासन व तहसील प्रशासनाकडे निवेदन सादर करण्यात आले.

## आ.नारायण कुचे यांची कार धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर उलटली; तिघे जण जखमी

जालना। प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील बदनापूर मतदारसंघाचे भाजप आमदार नारायण कुचे यांच्या कारला आज पहाटे भीषण अपघात झाला. छत्रपती संभाजीनगरवरून पंढरपूरकडे विठूरायाच्या दर्शनासाठी जात असताना ही दुर्घटना घडली. अपघाताच्या वेळी आमदार कुचे गाडीत नसल्याने ते थोडक्यात बचावले आहेत. मात्र, या घटनेत गाडीतील तिघे जण जखमी झाले असून, त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील जामखेड शिवारात आज पहाटे हा अपघात घडला. धोकादायक वळणावर कार नियंत्रित न झाल्यामुळे उलटल्याची माहिती आहे. चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि कार रस्त्यावरच भीषण रितीने उलटली. अपघातात कारचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून गाडीचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे. सुरुवातीला या गाडीतून आमदार नारायण कुचे यांच्यासह चौघे जण पंढरपूरकडे प्रवासाला निघाले होते. मात्र, प्रवासादरम्यान काही कामानिमित्त आमदार कुचे एका ठिकाणी गाडीतून खाली उतरले. त्यानंतर त्यांचा चालक आणि



अंगरक्षक बॉडीगार्ड दुसऱ्या एका व्यक्तीला आणण्यासाठी गाडी घेऊन पुढे गेले. त्या व्यक्तीला घेऊन परत येत असतानाच वाटेत हा भयंकर प्रसंग ओढवला. नेमक्या त्याचवेळी आमदार गाडीत नसल्याने मोठा अनर्थ टळला आणि ते पूर्णपणे सुरक्षित आहेत. या घटनेत आमदारांचा चालक आणि बॉडीगार्ड हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत, तर त्यांच्यासोबत असलेला आणखी एक जण किरकोळ जखमी झाला आहे. अपघाताची माहिती मिळताच स्थानिकांनी आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तिन्ही जखमींना तात्काळ जालना येथील स्थानिक रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून, सध्या त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू आहेत. पोलीस या अपघाताचा अधिक तपास करत आहेत.

## पंढरीच्या वाटेवरील वारकऱ्यांच्या सेवेमध्ये ४ वर्षापासून फ्रेंड्स फॉरएव्हर

### कळंबमध्ये वारकऱ्यांसाठी चहा, नाश्ता, भोजन, अन्? औषधोपचारही मोफत

कळंब। प्रतिनिधी

कळंब भूवैकुंठीचा राणा श्री विठ्ठलाच्या ओढीने पंढरीकडे निघालेल्या वारकऱ्यांची सेवा व्हावी, या भावनेतून कळंबमध्ये येरमाळा रस्त्यावर अन्नछत्र सुरू केले. वारकरी अन्? भाविकांसाठी फराळ, अल्पोपहार आणि औषधोपचार अशी सेवा पुरवली जाते. फेंड्स फॉरएव्हर या फाउंडेशनने श्रद्धा आणि सामाजिक बांधिलकी म्हणून हा सेवाभाव सुरू केला आहे. पंढरीच्या वाटेवरील हजारो वारकऱ्यांना या अन्नछत्रात प्रेमाने अन्? आपुलकीने भोजन व औषधोपचार दिले जात आहे. आतापर्यंत येथे सुमारे तीन हजार वारकऱ्यांनी चहा, नाश्ता घेतला आहे. आषाढी वारीनिमित्त येरमाळा रोडवरील राधेश्याम मंगल कार्यालयात गेल्या सहा दिवसांपासून सुरू असलेल्या या उपक्रमातून आतापर्यंत चहा, नाश्त्यासोबत गरजूंसाठी मोफत औषधोपचार आणि निवासाचीही व्यवस्थाही केली आहे

विशेष म्हणजे, या सेवाकार्यात फाउंडेशनचे सर्व सदस्य आपल्या पत्नी, मुलांसह आणि कुटुंबीयांसह दररोज स्वतः उपस्थित राहून वारकऱ्यांचे स्वागत, भोजन



व्यवस्था आणि अन्य सेवांची जबाबदारी पार पाडत आहेत. स्वतःच्या आर्थिक योगदानातून हा उपक्रम राबविला जात असल्याने त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. ज्या वारकऱ्यांना मुक्कामाची अडचण भासते, त्यांच्यासाठी राधेश्याम मंगल कार्यालयातच मोफत निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे अनेक वारकऱ्यांना सुरक्षित, सन्मानपूर्वक आणि समाधानकारक मुक्कामाची सुविधा उपलब्ध होत आहे. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राहुल कवडे, डॉ. अभिजित लोंढे, गोपाळ उबाळे, परमेश्वर मोरे, राजाभाऊ नागटिळक, दिनेश अष्टेकर, प्रा. जगदीश गवळी, गोविंद रणदिवे, उदयचंद्र खंडागळे, सतीश घाडगे, विनोद दळवे, अश्रुबा कस्पटे आदी परिश्रम घेत आहेत. आकर्षक मूर्ती पाहण्यासाठी थांबतात वारकरी अन्नछत्राचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे येथे स्थापित करण्यात आलेली आकर्षक विठ्ठल-रुक्मिणीची देखणी मूर्ती तिच्या दर्शनासाठी विदर्भ मराठवाड्यातून जाणारे वारकरी आवर्जून थांबत असून परिसरात दररोज सकाळी ६ ते १० आणि सायंकाळी ७ नंतर टाळ-मृदंगाच्या गजरात हरिनामाचा अखंड जयघोष घुमत असतो. विदर्भासह राज्याच्या विविध भागांतून आलेले वारकरी येथे उत्स्फूर्तपणे रिंगण, फुगडी, भजन आणि नामसंकीर्तनात सहभागी होत असल्याने परिसर अक्षरशः भक्तिरसाने भारावून जात आहे. चार वर्षांपासून वारकऱ्यांसाठी दातृत्व अन्? सेवाभाव या सेवाभावी उपक्रमाला यंदा चार वर्षे पूर्ण झाली असून, दातृत्व आणि सेवाभाव यांचा सुंदर संगम या माध्यमातून अनुभवायला मिळत आहे. अनेक ज्येष्ठ नागरिक या उपक्रमात आवर्जून सहभागी होत असून, लहान मुलांनाही समाजसेवा, संस्कार आणि विठ्ठलभक्तीचा अमूल्य वारसा प्रत्यक्ष अनुभवातून मिळत आहे.

## मुलांच्या भांडणातून दोन गटांत वाद; तलवारीने तरुणाची हत्या

जालना। प्रतिनिधी

लहान मुले खेळत असताना त्यांच्यात वाद झाला. या वादानंतर दोन गटांत भांडण झाले. या भांडणात रॉड, तलवारीने एकमेकांना मारहाण झाली. यात एका तरुणाच्या पोटाजवळील बरगडीत तलवार खुपसून हत्या करण्यात आली. या मारहाणीत दोन महिला गंभीर जखमी झाल्या. ही घटना जालना शहरातील वाल्मीकनगर भागात रविवारी सकाळी १२ वाजेच्या सुमारास घडली. अहमद रियाज सय्यद (१८) असे मृताचे नाव आहे. तन्वी अलीम खान, हुदा अलीम खान अशी गंभीर जखमी झालेल्या महिलांची नावे आहेत. या प्रकरणात दोन संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे.

वाल्मीकनगर भागातील गल्लीत लहान मुले खेळत होती. यातून दोन गटांत वाद झाला. सुरुवातीला शाब्दिक बाचाबाची झाली. नंतर वादाने हिंसक वळण घेतले. दोन्ही गटांतील काही जणांनी लोखंडी रॉड व तलवारीने एकमेकांवर हल्ला केला. मृत तरुण उर्दू माध्यमातून दहावीपर्यंत शिक्षण घेतलेला होता. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर तो बॅटरीचे दुकान चालवून व्यवसाय करीत होता. या व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नामुळे त्याच्या कुटुंबाला चांगला आधार होता. कुटुंबातील आर्थिक जबाबदाऱ्याही तो सक्षमपणे चालवित होता. त्याच्या हत्येच्या घटनेने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दरम्यान, तरुणाच्या पोटाजवळ बरगडीत वार झाल्याने तो वार पार छातीपर्यंत गेला होता. त्यामुळे अती रक्तस्राव झाला. मुलांच्या किरकोळ वादातून सुरू झालेला संघर्ष काही क्षणांतच भीषण हाणामारीत बदलला. दोन्ही गटांतील पुरुष, महिलाही रस्त्यावर उतरले. एकच गोंधळ उडाला. काहींच्या हातात लोखंडी रॉड होते. काहींच्या हातात तलवारी होत्या. एकमेकांवर बेछूट हल्ले झाले. आरडाओरडा झाला. किंकाळ्यांनी सुमारे अर्धा तास संपूर्ण परिसर हादरून गेला.

रस्त्यावर घडलेल्या या घटनेने नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या हाणामारीत अहमद रियाज सय्यद गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. तसेच दोन महिला जखमी झाल्या. त्यांच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. परिस्थिती नियंत्रणात आणली. जिल्हा सामान्य रुग्णालयासह वाल्मीकनगर परिसरात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस करत आहेत.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
मंगळवार दि.२१ जुलै २०२६ | ६

# शिक्षण व्यवस्था वाचवा, विद्यार्थ्यांना न्याय द्या - राजेंद्र मस्के

## राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन संपन्न!

बीड । प्रतिनिधी

देशातील युवक आपल्या उज्ज्वल भवितव्यासाठी दिवस-रात्र परिश्रम घेत आहेत. मात्र सातत्याने घडणाऱ्या पेपरफुटीच्या घटना, परीक्षा रद्द होणे, भरती प्रक्रियेतील विलंब आणि शिक्षण व्यवस्थेतील वाढता भ्रष्टाचार यामुळे विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरत असून त्यांच्या भविष्यासमोर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या सर्व घटनांची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी ठाम मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केली.





पेपरफुटीच्या घटनांनंतर युवकांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी नवी दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू केलेल्या आंदोलनाला देशभरातून मोठा प्रतिसाद मिळत असतानाही केंद्र सरकारकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्याच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने आज बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात प्रदेश पदाधिकारी, जिल्हा पदाधिकारी, तालुका पदाधिकारी, महिला आघाडी, विद्यार्थी आघाडी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आंदोलनानंतर आंदोलनकर्त्यांच्या वतीने जिल्हाधिकारी, बीड यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनामध्ये केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, पेपरफुटी प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच शिक्षण व्यवस्था पारदर्शक, विश्वासार्ह आणि विद्यार्थीकेंद्रित करण्यासाठी तातडीने प्रभावी उपाययोजना राबविण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली. युवकांच्या न्याय्य हक्कांसाठी आणि शिक्षण व्यवस्थेतील गंभीर त्रुटींकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी पेपरफुटीच्या घटनांमुळे लाखो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व व्यावसायिक भविष्य धोक्यात आल्याची तीव्र खंत व्यक्त केली. आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांच्या समर्थनार्थ जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचार, परीक्षा प्रक्रियेतील अनियमितता आणि युवकांवरील अन्यायाविरोधात उपस्थितांनी तीव्र संताप व्यक्त केला. युवक आणि विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचा संघर्ष यापुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहील, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# परळी मतदार संघातील मतदार विशेष संक्षिप्त पुनर्रिक्षण नोंदणी ३१ जुलै पर्यंत पूर्ण करा - धनंजय मुंडे

## मतदारांचे अधिकार अबाधित राखण्यासाठी बूथ लेव्हल एजंटांना धनंजय मुंडेंकडून सूचना

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

मतदारांचे अधिकार अबाधित राखण्यासाठी मतदार यादी अचूक, अद्ययावत आणि सर्वसमावेशक करण्याच्या दृष्टीने शासनाने मतदार विशेष संक्षिप्त पुनरीक्षण अभियान २००२ सालानंतर तब्बल २४ वर्षांनी राबवले असून यामध्ये प्रत्येक पात्र नागरिकांचे नाव यादीत समाविष्ट करणे तसेच अपात्र नावे वगळण्याच्या दृष्टीने कारवाई करणे गरजेचे असते; यासाठी शासनाने दहा





दिवसांचा वेळ वाढवून दिला असला तरीही ३१ जुलै पर्यंतच परळी वैद्यनाथ विधानसभा मतदारसंघातील मतदार पुनरीक्षण पूर्ण करून घेण्यात यावे, अशा सूचना माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी परळी मतदारसंघातील बूथ लेव्हल एजंटांच्या आढावा बैठकीत दिल्या आहेत.

आ. धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली परळी वैद्यनाथ मतदारसंघातील सर्व प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते व बूथ लेव्हल एजंट (BL-) यांची एकत्रित बैठक आयोजित करण्यात आली होती. परळी वैद्यनाथ शहर व ग्रामीण भाग अशा दोन टप्प्यात ही बैठक पार पडली.

◀◀ पान ३ वर

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीस जन्मठेपेची शिक्षा!

बीड । प्रतिनिधी

पोलिस ठाणे पेठ बीड अंतर्गत गु.र.नं. २४०/२०२४ नुसार कलम ७५, ७६, ६४(२)(ष)(ळ)(I), ६५(२), ३५१(२) इछड सह कलक ४, ६, ८ पोक्सो कायद्यान्वये अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास पिंक पथक बीड येथील सपोनि. लांडगे व पोह/पांडुरंग शिंदे यांनी केला होता.

सदर गुन्ह्यातील आरोपी रियाज जमील शेख (वय ३० वर्षे, रा. मोहमदिया कॉलनी, पेठ बीड) यास पोलीस ठाणे पेठ बीड येथील तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक श्री. सलमान तसेच सध्या पो.स्टे. पेठ बीड येथे कार्यरत असलेले पोलीस हवालदार सुभाष मोठे यांनी तात्काळ ताब्यात घेऊन तपासी अंमलदार यांच्यासमक्ष हजर केले. त्यानंतर तपासी अधिकारी यांनी आरोपीस अटक करून सखोल तपास पूर्ण केला व माननीय न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले होते.

माननीय जिल्हा सत्र न्यायालय ०१ बीड यांनी विशेष सत्र प्रकरण क्र. १८८/२०२४ मध्ये दिनांक १५/०७/२०२६ रोजी दिलेल्या निकालात पोक्सो कायद्यांतर्गत आरोपीस जन्मठेप व १०,०००/- रुपये दंड (दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावास) तसेच कलम ३५१(२) अंतर्गत १ वर्ष सश्रम कारावास व १,०००/- रुपये दंड (दंड न भरल्यास १ महिना सश्रम कारावास) अशी कडक शिक्षा ठोठावली आहे.

सदर खटला न्यायालयात सुरू असताना साक्ष-पुराव्यादरम्यान फिर्यादी व साक्षीदार यांना योग्य मार्गदर्शन करण्यात आले. मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी, बीड श्री. वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. निलेश केळे, पोह/१३५३ मोठे (कोर्ट पैरवी अधिकारी) व सफौ बाळासाहेब सानप यांनी ही उत्कृष्ट कामगिरी पार पाडली आहे.

# आष्टीत मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिराची भव्य तयारी

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सुरेश धस यांचा जनहिताचा उपक्रम

आष्टी । प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टी येथे मराठवाडा भूषण लोकनेते आमदार सुरेश अण्णा धस यांच्या नेतृत्वाखाली भव्य मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येत असून, या उपक्रमाची जय्यत तयारी सुरू झाली आहे.

या पार्श्वभूमीवर आज बीड येथे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिरासंदर्भात पूर्वनियोजित आढावा बैठक पार पडली. मुख्यमंत्री सहायता



निधीचे राज्य समन्वयक डॉ. रितेश पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीस आमदार सुरेश धस यांचे प्रतिनिधी म्हणून जि.प. सदस्य माऊली आप्पा जरांगे, भाजप विधानसभा अध्यक्ष गणेश नाना शिंदे तसेच पत्रकार प्रविण पोकळे उपस्थित होते.

बैठकीत शिबिराच्या नियोजनासह आरोग्य सेवा, तज्ज्ञ डॉक्टरांची उपलब्धता, विविध शस्त्रक्रिया, तपासण्या, रुग्ण नोंदणी व प्रशासनाच्या समन्वयाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

दि. २२ जुलै रोजी आष्टी येथे मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिराचा शुभारंभ होणार असून, दि. ६ व ७ ऑगस्ट रोजी आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघातील नागरिकांसाठी विनामूल्य (मोफत) मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिर आयोजित करण्यात येणार आहे. या शिबिरामध्ये गरजू रुग्णांना तज्ज्ञ वैद्यकीय सल्ला, तपासण्या तसेच आवश्यक उपचारांची सुविधा उपलब्ध करून

◀◀ पान ३ वर

# मुस्कान शेख व छाया पांचाळ मृत्यू प्रकरणी दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा!

### बीड जिल्हा रुग्णालयासमोर आंदोलन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा रुग्णालयात प्रसूतीदरम्यान वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्या हलगर्जीपणामुळे मृत्युमुखी पडलेल्या मुस्कान सिद्दिक शेख आणि छाया गणेश पांचाळ यांच्या मृत्यू प्रकरणी जबाबदार संबंधित वैद्यकीय अधिकारी व




कर्मचाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र राज्यचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली आज (दि. २०) सोमवार रोजी जिल्हा रुग्णालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले.

यावेळी मुस्कान शेख यांना न्याय द्या' छाया पांचाळ यांना न्याय द्या, ' दोषीं वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. आंदोलनानंतर अतिरिक्त जिल्हा

◀◀ पान ३ वर

# जिल्ह्यात पीएम राहत योजना प्रभावीपणे राबवा- जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

बीड । प्रतिनिधी

देशातील रस्ते अपघातातील मृत्यूदर कमी करण्यासाठी केंद्र सरकारची पीएम राहत योजना ही कॅशलेस उपचार योजना असून अत्यंत फायदेशीर आहे. या योजनेअर्गत अपघातग्रस्त व्यक्तीला जवळच्या रुग्णालयात दाखल केल्यास तातडीने मोफत उपचार मिळतात. तरी रस्ते अपघातातील गंभीर जखमींना तातडीने उपचार मिळवून देण्यासाठी केंद्र सरकारची पीएम राहत योजना महत्वाची असून आरोग्य आणि पोलीस प्रशासनाने परस्परांमध्ये समन्वय ठेवून जिल्ह्यात प्रभावीपणे राबवावी, अशी सुचना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केली.

जिल्हाधिकारी कार्यालयात पीएम राहत योजनेची आढावा बैठक पार पडली. या बैठकीला प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी दिव्यांक गुप्ता यांच्यासह पोलिस, आरोग्यसह संबंधित यंत्रणेचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

अपघातानंतरचा पहिला तास म्हणजेच गोल्डन अवर हा रुग्णाचा जीव वाचवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. या काळात पैशाअभावी उपचार थांबू नयेत, म्हणून सरकारने ही कॅशलेस सुविधा सुरू केली आहे. यामध्ये कोणत्याही कागदपत्रांची किंवा आगाऊ पैशांची वाट न पाहता डॉक्टर त्वरित उपचार सुरू करतात. ही योजना गरीब आणि गरजू लोकांसाठी खऱ्या अर्थाने जीवनदायी ठरणारी आहे. त्यामुळे तिची अंमलबजावणी चोखपणे व्हावी, असे निर्देशही जिल्हाधिकारी श्री.जॉन्सन यांनी यावेळी दिले.

# शिवहर शेटे यांच्या मातोश्री श्रीमती इंदुबाई शेटे यांचे दु:खद निधन

माजलगाव । प्रतिनिधी

वीरशैव लिंगायत समाजाचे कार्यकर्ते तथा नगरपरिषद माजलगाव कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष शिवहार चनबस अप्पा शेटे यांच्या मातोश्री श्रीमती इंदुबाई चनबस अप्पा शेटे (वय ८५ वर्ष) यांचे वार्धक्याने रविवार दि.१९ जुलै रोजी रात्री ८:३० वाजता दुःखद निधन झाले,त्या वीरशैव समाजातील वयोवृद्ध अशा माजलगावकर मठाच्या त्या शिवभक्त होत्या, त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील हेडगेवार हॉस्पिटल येथे उपचार चालू होते परंतु उपचाराला त्यांच्या प्रकृतीने साथ न दिल्याने त्यांचे निधन झाले.



त्यांच्यावर सोमवार दि.२० जुलै रोजी सकाळी ११:०० वाजता माजलगाव येथील वीरशैव समाजाच्या रुद्रभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. कै.इंदुबाई यांच्या पश्चात मुलगा शिवहार व ओमप्रकाश तसेच तीन विवाहित मुली सौ.किशकिंदा औटे सौ. शिवकन्या महाजन सौ.राजकन्या महाजन तसेच सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे.शेटे कुटुंबीयाच्या दुखःत दै राज्य लोकतंत्र परीवार सहभागी आहे.

# शिक्षिकेची बदली रद्द न झाल्यास आंदोलनाचा इशारा

## पायतळवाडी येथील विद्यार्थी व पालकांचा प्रशासनाला निवेदनाद्वारे इशारा

माजलगाव । प्रतिनिधी

जिल्हा परिषद शाळा पायतळवाडी (धनगरवाडी) येथील शिक्षिका सौ. शिल्पा मधुकर मोतकुरवार यांच्या प्रस्तावित बदलीला विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. बदली तात्काळ स्थगित अथवा रद्द करण्यात यावी, अशी मागणी करत मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद बीड यांना निवेदन सादर करण्यात आले.



निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,सौ. मोतकुरवार यांनी शाळेची शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले असून, त्यांच्या कार्यकाळात शाळेची पटसंख्या ३५ वरून ७० पर्यंत वाढली आहे. त्यामुळे पालकांचा शाळेवरील विश्वास अधिक दृढ झाला असल्याचे ग्रामस्थांनी म्हटले आहे.शिक्षिकेची बदली झाल्यास विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होईल आणि शाळेच्या प्रगतीला खीळ बसेल, अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे.मागणीची दखल न घेतल्यास गटशिक्षणाधिकारी कार्यालय, माजलगाव येथे विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांच्या उपस्थितीत शांततापूर्ण लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.या निवेदनावर अशोक अर्जुन व सुरेश बोडखे यांच्यासह पायतळवाडी (धनगरवाडी) येथील ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ अंबाजोगाईत भव्य मोर्चा ‘धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या’ च्या घोषणांनी परिसर दणाणला

अंबाजोगाई । प्रतिनिधी

'नीट' परीक्षा पेपरफुटी प्रकरणातील दोषींवर तात्काळ व कठोर कारवाई करावी, लाखों विद्यार्थ्यांच्या भविष्याशी सुरू असलेला अन्याय थांबवून त्यांना न्याय मिळावा, या मागणीसाठी दिल्लीतील जंतरमंतर येथे आंदोलन करणारे प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ आज दिनांक २० जुलै रोजी अंबाजोगाई शहरात भव्य मोर्चा काढण्यात आला.

या मोर्चात विद्यार्थी, युवक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.




शहरातील नगरपरिषद परिसरातून मोर्चाला सुरुवात झाली. शहरातील प्रमुख मार्गावरून मार्गक्रमण करत हा मोर्चा उपजिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी तानाशाही नहीं चलेगी', 'धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या', 'इन्कलाब जिंदाबाद' अशा जोरदार घोषणा देत परिसर दणाणून सोडला. केंद्र सरकारने 'नीट' पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याशी होणारा खेळ तातडीने थांबवावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. मोर्चाच्या शेवटी उपजिल्हाधिकारी यांच्यामार्फत केंद्र सरकारला निवेदन सादर करण्यात आले. यावेळी आंदोलनकर्त्यांनी,

◀◀ पान ३ वर

# वक्फ बोर्डाच्या पोर्टलवर ९८ टक्के नोंदी अध्यक्ष समीर काझी यांच्या प्रयत्नांना यश

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य वक्फ महामंडळाचे अध्यक्ष समीर काझी यांच्या दूरदर्शी नेतृत्व, सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि प्रभावी नियोजनामुळे महाराष्ट्र राज्याने एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. केंद्र शासनाच्या पोर्टलवर राज्यातील सुमारे ३२ हजार वक्फ संस्थांच्या ४६ हजार ९६१ मालमत्तांची म्हणजेच ९८.१८ टक्के यशस्वीरित्या नोंद करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे सर्व सदस्य हसनैन शाकेर, मौलाना अतहर अली, ए.एफ. पठाण, इफ्तेखार हाश्मी, मुख्य कार्यकारी अधिकारी फैय्याज खान यांच्यासह सर्व अधिकारी, कर्मचारी, जिल्हा स्तरीय यंत्रणेच्या टीमवर्कमुळेच हे शक्य झाले असून त्यात राज्यातील वक्फ संस्थांचेही मोठे योगदान राहिले आहे. विशेष म्हणजे समीर काझी वडील गुलाम नबी

काझी यांचे १५ जुलै २०२६ रोजी निधन झाले आणि पोर्टलवरील नोंदीची शेवटची

तारीख १६ जुलै होती. अशा परिस्थितीतही दुःख बाजूला ठेवून समीर काझी यांनी सातत्याने सीईओ यांच्या संपर्कात राहून शेवटच्या दिवशीही जास्तीत जास्त मालमत्ता नोंदी करून घेतल्या.

महाराष्ट्र वक्फ न्यायाधिकरणाने वक्फ मालमत्तांची उम्मीद पोर्टलवर नोंद करण्यासाठी दिलेल्या सहा महिन्यांच्या मुदतवाढीची अंतिम तारीख १६ जुलै २०२६ होती. त्या निर्धारित मुदतीत ही प्रक्रिया पूर्ण करून महाराष्ट्राने देशासमोर आदर्श निर्माण केला आहे. अपलोड करण्यात

आलेल्या मालमत्तांची संख्या ही महाराष्ट्रातील एकूण वक्फ मालमत्तांपैकी सुमारे ९८ टक्के आहे. त्यामुळे वक्फ मालमत्तांच्या डिजिटल नोंदणीमध्ये महाराष्ट्र देशातील आघाडीच्या राज्यांमध्ये स्थान मिळविण्यात यशस्वी ठरला आहे. या उल्लेखनीय यशामागे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे अध्यक्ष ना. समीर काझी यांचे प्रभावी नेतृत्व, नियमित आढावा बैठका, जिल्हानिहाय पाठपुरावा, वेळोवेळी दिलेले

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26